रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक १७५
www.ramprahar.com
राम प्रहर
गुरुवार, ११ जानेवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

श्रीराम मंदिर सोहळ्यानिमित्त देणार आनंदाचा शिधा

मुंबई : भगवान श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा अयोध्येतील राम मंदिरात २२ जानेवारी रोजी करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने महाराष्ट्रातील जनतेला राज्य सरकारने आनंदाचा शिधा देण्याचे ठरविले आहे. राज्यातील अनेकांना श्रीराम मंदिर कार्यक्रमाचे आमंत्रण देण्यात आले आहे. अनेक रामभक्त अयोध्येच्या दिशेने जाणार आहेत. राज्यातील सामान्य नागरिकांनाही या दिनाचा सोहळा करता यावा याकरीता राज्य सरकारने आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय घेतला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासंदर्भात एक्सद्वारे माहिती दिली आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, राज्य मंत्रिमंडळाचा हा निर्णय म्हणजे हे सरकार सर्वसामान्य जनतेचे आहे, याचीच साक्ष देणारे आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

अंतरंग

अवजड माल वाहतूक उद्या असणार बंद/२
'कोर्लई'च्या दरवाजावर कुटूंबासह ठार मारण्याचे धमकीपत्र/७
कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत भक्ती भोईरला 'सुवर्ण'/८

शिवसेनेचे सर्व आमदार पात्र

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचा निर्णय

मुंबई : प्रतिनिधी

शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल बुधवारी (दि. १०) विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी जाहीर केला. मूळ शिवसेना पक्ष म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाला मान्यता देत असल्याचे सांगत अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी उद्धव ठाकरेंना मोठा धक्का दिला. त्याचप्रमाणे शिंदे समर्थक १६ आमदारांना अपात्र ठरवण्याची मागणी करणारी याचिकाही फेटाळली. या निकालानंतर शिवसेनेच्या (शिंदे गट) कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. दोन्ही गटाचे आमदार पात्र ठरले असून कोणीही आमदार अपात्र असणार नाही.

> **आजच्या निर्णयामुळे घराणेशाही मोडीत निघाली आहे. पक्ष कोणाचीही खासगी मालमत्ता नसते. सत्याचा विजय झाला आहे.**
> **–एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह ३७ आमदार होते. भरत गोगावले हे अधिकृत प्रतोद आहेत, असे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितले. शिवसेना पक्षप्रमुख म्हणून उद्धव ठाकरे एकटे गटनेत्याला पदावरून काढू शकत नाहीत. शिवसेनेच्या घटनेनुसार राष्ट्रीय कार्यकारिणीला अंतिम निर्णयाचे अधिकार आहेत. पक्षप्रमुखाला सर्वोच्च अधिकार देणे हे लोकशाहीसाठी घातक आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांची केलेली हकालपट्टी अमान्य आहे, असे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी स्पष्ट केले.

विधानभवनातील सेंट्रल हॉलमध्ये या निकालाचे वाचन करण्यात आले. निकालपत्रातील ठळक मुद्दे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी सभागृहात वाचून दाखवले. निकालाची सुरुवात करण्याआधी त्यांनी सुप्रीम कोर्ट तसेच सुनावणीवेळी सहकार्य केल्याबद्दल दोन्ही गटाच्या वकिलांचे आभार मानले.

अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी, दोन्ही पक्षांनी (शिवसेनेचे दोन गट) निवडणूक आयोगाला सादर केलेल्या घटनेवर एकमत नाही. नेतृत्व रचनेबाबतही दोन्ही पक्षांची मते भिन्न आहेत. **(पान २ वर..)**

पद्मदुर्ग किल्ल्यावर पर्यटन सुविधा पुरवा

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बैठकीत सूचना

मुरूड : प्रतिनिधी

मुरूड तालुक्यातील पद्मदुर्ग किल्ल्यावर पर्यटकांसाठी सुविधांची निर्मिती करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

पद्मदुर्ग किल्ल्यावर शिवसृष्टी निर्माण करण्यासाठी निधी उपलब्ध करणे तसेच पर्यटक व स्थानिकांना किल्ल्यावर उतरण्यासाठी नवीन जेट्टीची निर्मिती करण्याबाबत खासदार सुनील तटकरे यांच्या मागणीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमक्ष पुरातत्व खाते, मेरीटाईम बोर्ड, बंदर विभाग, पतन विभाग, पर्यटन विभाग आदी खात्याच्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली होती.

या एका बैठकीत, पद्मदुर्ग किल्ल्यावर सोईसुविधा निर्माण करण्यासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही. आवश्यक असणारी कामे तातडीने सूचवून ती पूर्ण करावी. कोकणच्या पर्यटन विकासासाठी किनारी भागातील जलदुर्गाचा विकास करताना जेट्टीची उभारणी करावी. पद्मदुर्ग किल्ल्याच्या विकासाचा आराखडा तयार करावा व त्यासाठी पर्यटन विभागाने सहकार्य करावे, अशा सूचनाही त्यांनी बैठकीत केल्या.

या बैठकीला खासदार सुनील तटकरे, नियोजन विभागाचे प्रधान सचिव, वित्त विभागाच्या सचिव, पर्यटन विभागाच्या सचिव, भारतीय पुरातत्व विभागाचे अधीक्षक, महाराष्ट्र पर्यटन मंत्रालय संचालक आदी उपस्थित होते.

लोकनेते दि. बा. पाटीलसाहेब वक्तृत्व स्पर्धा

पनवेल : रामप्रहर वृत्त

लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने व श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल यांच्या सौजन्याने १६ जानेवारीला जासई येथे लोकनेते दि. बा. पाटीलसाहेब वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

इ. पाचवी ते आठवी या गटासाठी गरीबांचे कैवारी : दि. बा. पाटील साहेब, आमचे लाडके दि. बा. पाटील साहेब, दि. बा. पाटील साहेबांची गौरवशाली जीवनगाथा हे विषय असून प्रथम क्रमांकास १५०० रुपये, द्वितीय १००० रुपये, तृतीय ५०० तर उतेजनार्थ २५० रुपये बक्षीस आहे. इ. नववी ते बारावी गटासाठी झुंजार नेते : दि. बा. पाटील साहेब, दि. बा.: प्रकल्पग्रस्तांचे दैवत, दिबांसारखा नेता होणे नाही हे विषय असून प्रथम क्रमांकास २५०० रुपये, द्वितीय १५०० रुपये, तृतीय १००० तर उतेजनार्थ ५०० रुपये बक्षीस आहे. महाविद्यालयीन गटासाठी दिबांचा विधीमंडळातील बुलंद आवाज, दि. बा. पाटील यांच्या आंदोलनाचा इतिहास, दि. बा. पाटील : शाहू, फुले, आंबेडकरांचे खरे वारसदार हे विषय असून प्रथम क्रमांकास ५००० रुपये, द्वितीय ३००० रुपये, तृतीय २००० तर उतेजनार्थ १००० रुपये बक्षीस आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी राजेश गायकर (९८१९९६९९९१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

आमदार राजन साळवी यांची 'एसीबी'कडून पुन्हा चौकशी

अलिबाग : प्रतिनिधी

बेकायदेशीर मालमत्तेसंदर्भात ठाकरे गटाचे राजापुरचे आमदार राजन साळवी यांची बुधवारी (दि. १०) रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) चौकशी केली.

यापूर्वी आमदार राजन साळवी यांची एसीबीने दोन वेळा चौकशी केली होती. त्या वेळी आमदार साळवी यांच्या पत्नीच्या तसेच दोन भावांच्या नावे असलेल्या मालमत्तेसंदर्भात माहिती घेतली होती. शुक्रवारी राजन साळवी हे आपले बंधू व पुतण्या यांच्यासमेवत एसीबीच्या अलिबाग येथील कार्यालयात हजर राहिले. या वेळी त्यांच्यासमवेत जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, युवा सेनेचे अमीर ठाकूर उपस्थित होते.

आमदार राजन साळवी यांनी, एसीबीला जी माहिती हवी होती ती सर्व माहिती दिली आहे. आता मला पुन्हा एसीबीने बोलावले तरी मी हजर राहणार नाही. माझा न्यायदेवतेवर विश्वास आहे, असे सांगितले.

राज्यातील नागरी भागात आता बाल विकास केंद्र

मुंबई : प्रतिनिधी

कुपोषणावर मात करण्यासाठी राज्यातील नागरी भागामध्ये ग्रामीण बाल विकास केंद्र योजनेच्या धर्तीवर नागरी भागातील अतितीव्र कुपोषित बालकांसाठी नागरी बाल विकास केंद्र योजना सुरू करण्यास बुधवारी (दि. १०) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यात ग्रामीण भागामधील अतितीव्र कुपोषित बालकांच्या कुपोषणावर उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने अंगणवाडी स्तरावर ग्राम बालविकास केंद्र योजना कार्यान्वित आहे. राज्यात नागरीकरणाचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. निम्म्यापेक्षा अधिक लोकसंख्या नागरी भागात राहत असल्याने नागरीकरण क्षेत्रातील अंगणवाड्यांमध्ये अतितीव्र कुपोषित बालकांच्या संख्येतदेखील वाढ होत असून ग्राम बाल विकास केंद्राच्या धर्तीवर नागरी बालविकास केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील राज्यातील १०४ नागरी प्रकल्पांमध्ये ही योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेसाठी वार्षिक अंदाजे ११.५२ कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली असून प्रती वर्ष अतितीव्र कुपोषित बालकांच्या संख्येनुसार येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

उरणमध्ये घरफोडीचे सत्र सुरू

कळंबुसरे, चिरनेर गावात लाखोंचा ऐवज चोरी

उरण : प्रतिनिधी

उरण पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडीच सत्र सुरू असून कळंबुसरे, चिरनेर या गावातील रहिवाशांच्या घरातील मौल्यवान सोन्या चांदीचे दागिने, रोख रक्कम घेऊन चोरट्यांनी पोबारा केल्याची घटना घडली आहे. घरफोड्या मंगळवारी (दि. ९) रात्रीच्या अंधारात घडल्या असून रहिवाशी भयभीत झाले आहेत.

उरण पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात परप्रांतीय फेरीवाल्यांनी आपले बस्तान बसवले आहे. तसेच अमली पदार्थ विक्रीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. अशा अवैध धंद्यातून तरुण वर्ग चोरीच्या घटनाकडे वळत आहे.

त्यामुळे चिरनेर, विंधणे, जासई, चिर्ले, धुतूम, बोकडविरा, नागाव सारख्या गावात या अगोदर मोठ्या प्रमाणात घरफोड्या, होऊन रहिवाशांना चोरीच्या घटनातून आपले प्राण गमवावे लागले आहे.

मंगळवारी रात्रीच्या सुमारास रहिवाशी झोपले असताना अंधाराचा फायदा उठवत चोरट्यांनी कळंबुसरे गावातील हेमंत हिराचंद नाईक चंद्रशेखर पांडुरंग राऊत, वसंत भास्कर राऊत तसेच चिरनेर गावातील ठकुबाई ठाकूर सह इतर बंद घरातील दरवाजांच्या कडी कोयंडा तोडून कपाटातील सोन्या चांदीचे दागिने आणि रोख रक्कम घेऊन पोबारा केला आहे.

घरफोड्यांसंदर्भात उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, पोलीस यंत्रणेने तात्काळ घटना स्थळी धाव घेऊन पंचनामे सुरू केले आहेत. घरफोडीच्या घटना या सीसीटीव्हीमध्ये कैद झाल्याने पोलीस यंत्रणा चोरट्यांच्या मार्गावर लागले असल्याचे पोलीस सुत्रांकडून सांगण्यात येत आहे.

पनवेल : उलवे नोड येथील फोर्टी प्लस असोसिएशनचे सदस्य सचिन खारकर यांचा वाढदिवस असोसिएशनच्या वतीने साजरा करण्यात आला. या वेळी सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाचे चेअरमन शरद खारकर, गौरी स्पोर्ट्स क्लब अध्यक्ष विजय खारकर, फोर्टी प्लस ग्रुप मॉर्निंग अध्यक्ष यशवंत ओवळेकर, फोर्टी प्लस सेक्टर २४ उलवे नोड अध्यक्ष जितेंद्र सोमासे, संदीप पाटील, निलेश मढवी, राकेश पाटील, मिथुन म्हात्रे, नंदू गायकवाड, प्रताप पाटील, प्रदीप खारकर, विशाल मढवी, संजय गायकवाड आदी उपस्थित होते.

जड-अवजड माल वाहतूक उद्या बंद

रायगड : रामप्रहर वृत्त

शिवडी न्हावाशेवा सी लिंक (एमटीएचएल) रोडचा उद्घाटन कार्यक्रम १२ जानेवारी २०२४ रोजी आहे. त्या अनुषंगाने वाहतुक नियमनाकरीता नवी मुंबई वाहतुक विभागाकडून योग्य तो रोड बंदोबस्त नेमण्यात येणार आहे.

या दिवशी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत वाहतुकीचा ओघ जास्त प्रमाणात अपेक्षित असल्याने रोड बंदोबस्त, पार्किंग नियोजन व सुरक्षेच्या दृष्टीने १२ जानेवारी २०२४ रोजी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीत सर्व प्रकारच्या जड-अवजड मालवाहतुक करणाऱ्या वाहनांना शहराचे सर्व मार्गावरून मार्गस्थ होण्यास, प्रवेश करण्यास आणि वाहने उभी (पार्क) करण्यास सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १० वाजेपर्यंत पूर्णतः बंद राहण्याची अधिसूचना पोलीस उपआयुक्त वाहतूक नवी मुंबई तिरुपती काकडे यांनी जारी केली आहे.

ही वाहतूक नियंत्रण अधिसूचना जीवनावश्यक वाहने, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, या कार्यकमाचे अनुषंगाने येणारी वाहने, प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या बसेस व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

मुंबई : जय गोपीनाथ प्रतिष्ठानच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन वरळी येथील गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या कार्यालयामध्ये भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी जय गोपीनाथ प्रतिष्ठानचे मार्गदर्शक बबन बारगजे तसेच आधारस्तंभ विजय गोल्हार, अध्यक्ष सुभाष आंधळे, सचिव हनुमंत विघ्ने, खजिनदार संग्राम केंद्रे, उपसचिव विठ्ठल घोळवे, उपखजिनदार पप्पू सोनवणे, कार्याध्यक्ष भगवान जायभाय, रायगड जिल्हाध्यक्ष किरण गीते, उरण तालुका अध्यक्ष अर्जुन डोंगरे, उपाध्यक्ष वैशाली मुंडे, कार्यालयप्रमुख विठ्ठल गुट्टे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

उरण : मार्गशीर्ष महिन्यात विष्णुप्रिय महालक्ष्मीच्या व्रतवैकल्यास घरा-घरात प्रारंभ होतो. या व्रतासाठी लागणाऱ्या पूजेच्या साहित्यात आकर्षक सुंदर सजविलेल्या महालक्ष्मी देवीचे मुखवटे, नारळ, वेणी, पाच फळे, खायची पाने, खण, फुले आदी खरेदी करण्यासाठी महिलांनी उरण बाजार पेठेत गर्दी केली होती.

'सीकेटी'च्या मराठी माध्यमिकचे उद्या स्नेहसंमेलन

पनवेल : रामप्रहर वृत्त

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या मराठी माध्यमाच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन २०२३-२४ व पारितोषिक वितरण सोहळा शुक्रवारी (दि. १२) सायंकाळी ५.३० वाजता आयोजित करण्यात आले आहे.

लख लख चंदेरी या शीर्षकाखाली व संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्या वर्षा प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या समारंभाचे प्रमुख पाहुणे सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक बाबासाहेब हणमंत चिमणे, गटशिक्षणाधिकारी सिताराम रामा मोहिते आहेत.

विशेष अतिथी म्हणून संस्थेच्या कार्यकारिणी सदस्य हरिश्चंद्र पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांची उपस्थिती असेल. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, मुख्याध्यापक कैसाल सत्रे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मेहनत घेत आहेत.

खोपोलीत शिवसेनेचा जल्लोष

खोपोली, चौक : प्रतिनिधी

मूळ शिवसेना कोणाची यावरून विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेला निकालानुसार शिंदे गटाची शिवसेना मूळ असल्याच्या निकाल समजल्यानंतर शिवसेनेचे शिंदे गटाचे शहर अध्यक्ष संदीप पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना कार्यालयासमोर फटाके वाजून जल्लोष करण्यात आला.

या वेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जय जयकाराच्या घोषणा देण्यात आल्या. या वेळी शहराध्यक्ष संदीप पाटील, कार्याध्यक्ष अनिल मींडे, विधानसभा प्रवक्ते अमोल पाटील, माजी नगरसेवक संतोष माळकर, महिला आघाडीच्या प्रिया जाधव, रेश्मा अंग्रे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

पान १ वरून

शिवसेनेचे सर्व आमदार पात्र; विधानसभा अध्यक्षांचा निर्णय

त्यामुळे एकमेव पैलू म्हणजे विधिमंडळ पक्षातील बहुमत. वादाच्या आधी अस्तित्वात असलेली नेतृत्व रचना लक्षात घेऊन संबंधित घटना मला ठरवावी लागेल. शिवसेनेची २०१८ची सुधारित घटना वैध मानली जाऊ शकत नाही, कारण ती भारतीय निवडणूक आयोगाच्या नोंदीमध्ये नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, मी इतर कोणत्याही घटकाचा आधार घेऊ शकत नाही. नोंदीनुसार, मी वैध संविधान म्हणून शिवसेनेच्या १९९९च्या घटनेचा आधार घेत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, दोन्ही गटांनी संविधान पक्षाच्या वेगवेगळ्या आवृत्त्या सादर केल्या आहेत. अशा परिस्थितीत दोन गट उदयास येण्यापूर्वी दोन्ही पक्षांच्या संमतीने निवडणूक आयोगाकडे सादर झालेली घटना विचारात घेतली पाहिजे.

महाराष्ट्र विधानसभा सचिवालयाने ७ जून २०२३ रोजी एक पत्र दिले होते, ज्यामध्ये निवडणूक आयोग कार्यालयाला पक्षाच्या घटनेची/नियमांची प्रत प्रदान करण्याची विनंती केली होती. खरा राजकीय पक्ष कोणता गट आहे, हे ठरवण्यासाठी आयोगाने दिलेली शिवसेनेची घटना ही शिवसेनेची संबंधित घटना आहे. दहाव्या परिशिष्टानुसार मला केवळ राजकीय नेतृत्व पाहायचे आहे. उलटतपासणीला न आल्यामुळे ठाकरे गटाचे प्रतिज्ञापत्र अमान्य करण्यात आले आहे.

माझ्यासमोरील पुरावे आणि नोंदी पाहता, प्रथमदर्शनी असे सुचित होते की, २०१३ आणि २०१८मध्ये पक्षात कोणत्याही निवडणुका झाल्या नाहीत. तथापि, मी १०व्या अनुसूची अंतर्गत अधिकार क्षेत्राचा वापर करताना त्या पलिकडे जाऊ शकत नाही. आयोगाचे रेकॉर्ड संकेतस्थळावर उपलब्ध आहेत आणि म्हणूनच मी संबंधित नेतृत्व रचना ठरवताना या पैलूचा विचार केला नाही. अशाप्रकारे वरील निष्कर्ष लक्षात घेता, मला असे आढळून आले आहे की, निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या दि. २७ फेब्रुवारी २०१८च्या पत्रात प्रतिबिंबित झालेली शिवसेनेची नेतृत्व रचना ही कोणता गट खरा पक्ष आहे, हे ठरवण्याच्या उद्देशाने विचारात घेणे आवश्यक आहे.

शिवसेना पक्षप्रमुख एकटे गटनेत्याला पदावरून काढू शकत नाहीत. शिवसेनेच्या घटनेनुसार राष्ट्रीय कार्यकारिणीला अंतिम निर्णयाचे अधिकार आहेत. पक्षप्रमुखाला सर्वोच्च अधिकार देणे हे लोकशाहीसाठी घातक आहे. अन्यथा छोट्या घटकांसह कोणीच पक्षप्रमुखांविरोधात बोलू शकणार नाहीत. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांची केलेली हकालपट्टी अमान्य आहे, असे राहुल नार्वेकर यांनी स्पष्ट केले.

१९९९ घटनेनुसार उद्धव ठाकरेंना कोणालाही पदावरून हटवण्याचा अधिकार नाही, पण पक्षनेतृत्वाचे मत हे पक्षाचे मत असे गृहित धरता येत नाही. त्यामुळे एकनाथ शिंदेंना हटवण्याचा निर्णय उद्धव ठाकरे घेऊ शकत नाहीत तो चुकीचा निर्णय आहे. त्यासाठी राष्ट्रीय कार्यकारिणीसोबत चर्चा करूनच निर्णय घेणे अपेक्षित आहे. पक्षप्रमुखांचे मत हे अंतिम नाही. त्यामुळे पक्षाच्या घटनेनुसार त्याला एखाद्याला पदावरून काढायचे अधिकार नाहीत. उद्धव ठाकरे गटाकडून जी कागदपत्र सादर केली त्यातही बऱ्याच त्रुटी आहेत. निवडणूक आयोगाकडे उद्धव ठाकरे गटाने सादर केलेल्या दाव्यातही तफावत आहे. एकीकडे ते सांगतात पक्षाची बैठक सेनाभवनात झाली, तर दुसरीकडे सांगतात तीच बैठक ऑनलाईन झाली होती. त्यामुळे त्यांची कागदपत्रे संभ्रम निर्माण करणारी आहेत. त्यामुळे २०१८मध्ये उद्धव ठाकरे यांची पक्षप्रमुख म्हणून झालेली निवड ही पक्षाच्या घटनेला अनुसर नसल्याचे स्पष्ट होते, असे अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले.

दोन्ही गटाचे आमदार पात्र ठरले असून कोणीही आमदार अपात्र असणार नाही. त्यामुळे, कुठल्याही आमदाराची आमदारकी जाणार नाही. दरम्यान, निकालाची प्रत सर्वांना दिली जाणार असल्याचेही नार्वे करांनी स्पष्ट केले.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक आज दोन तासांसाठी बंद

खोपोली : प्रतिनिधी

गँट्री बसवण्याच्या कामासाठी मुंबई पुणे द्रुतगती मार्ग गुरुवारी (दि. ११) मुंबई लेन दोन तासासाठी बंद राहणार आहे त्यादरम्यान वाहतुकीसाठी पर्यायी मार्गाचा वापर करावा लागणार आहे. मुंबईपुणे द्रुतगती महामार्गावरमुंबई वाहिनीवर पळस्पे हद्दीत गँट्री बसविण्यात येणार आहे. दुपारी, दिड ते साडेतीन दरम्यान मुंबई वाहिनीवरील सर्व प्रकारच्या हलक्या व जड अवजड वाहनांची वाहतूक पूर्णतः बंद करण्यात येणार आहे.

पुणेहुन मुंबईकडे जाणारी हलके वाहने व बसेस ही खोपोली बाह्यमार्गावरून वळवून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ (जुना पुणे मुंबई महामार्गा) वरून खोपोली शहरातून पुढे शेडुंग टोलनाका मार्गे मुंबई वाहिनीवर मार्गस्थ होतील.

पुणेहुन मुंबईकडे जाणारी हलकी व जड अवजड वाहने ही खालापूर टोल नाका येथील डाव्या बाजूकडील शेवटची लेन खालापूर बाह्य मार्ग येथून वळवून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ (जुना पुणे मुंबई महामार्गावरून) खालापूर शहरातून पुढे शेडुंग टोलनाका मार्गे मुंबई वाहिनीवर मार्गस्थ होतील. मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ या मार्गावरून पुणे बाजूकडून मुंबई बाजूकडे येणारी वाहने शेडुंग फाटावरून बोर्ले टोल नाक्याकडे न येता सरळ पनवेल दिशेने मार्गस्थ करण्यात येतील, अशी पर्यायी वाहतूक व्यवस्था अशी असेल.

प्रेक्षकांनी सरसकट शेरे मारू नयेत-शिल्पा नवलकर

पनवेल : वार्ताहर

'अभिनेते आणि अभिनेत्री अभ्यास करून, प्रचंड मेहनत घेऊन खरोखरच मनापासून भूमिका साकारत असतात. एखादी भूमिका साकारत असताना त्या कलाकाराला विशिष्ट कौटुंबिक पार्श्वभूमी, अनुभव असल्याचा गैरसमज प्रेक्षकांनी मनातून काढून टाकला पाहिजे. असा अनुभव असेल तर तो अभिनय होऊच शकत नाही हे लक्षात घेऊन कलाकारांच्या भूमिकेकडे पहावे, सरसकट शेरे प्रेक्षकांनी मारू नये, असे मत 'बाईपण भारी देवा' या चित्रपटात केतकीची भूमिका साकारणाऱ्या शिल्पा नवलकर यांनी मांडले.

नवीन पनवेल येथील आचार्य अत्रे कट्ट्यातर्फे सिडको उद्यानात आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्यांनी त्यांचा कलाप्रवास उलगडून दाखविला. त्या पुढे म्हणाल्या, सध्या समाजमाध्यमांच्या अतिरेकी वापरामुळे दुसऱ्यांचे ऐकून घेण्याची क्षमताच नाहीशी होत चालली आहे.

शाईची नोंद काव्यसंग्रहाचे प्रकाशन

नवी मुंबई : बातमीदार

ठाणे येथील मो. ह. विद्यालय येथील विद्यालयाच्या सभागृहात कवी तसेच नवी मुंबई गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी उत्तम दा. तरकसे यांच्या शाईची नोंद या काव्यसंग्रहाचे प्रकाशन सोहळा झाला.

या काव्यसंग्रहाचे प्रकाशन प्रमुख अतिथी डॉ. लक्ष्मण शिवणेकर, भागवत बनसोडे, काशिनाथ महाजन, श्रीनिवास गडकरी, सुनील ओवाळ, डॉ. कुणाल इंगळे या मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन सोहळ झाला. सदर कार्यक्रमाच्या विचार मंचावर कवी खंडू अढांगळे, राजेंद्र बनसोडे, राजेंद्र कांबळे, कल्याण हणवते या कार्यक्रमास पोलीस दलातील कवी नारायण गाडे, कवी जीवा मोरे, तसेच गझलकार सोमीनाथ सोनवणे हे मान्यवर हजर होते. सूत्रसंचालन शिल्पा परुळेकर यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन हे ठाण्याचे ललित कला फाउंडेशन दिलिप कारखानीस यांन केले. काव्यसंग्रह पुस्तक रूपात आणण्यासाठी कारखानीस यांनी सहकार्य केले.

त्याकरिता कवी उत्तम तरकसे यांनी ललित कला फाउंडेशनचे अध्यक्ष कार्यकारणी व सर्व सदस्यांचे मनापासून ऋण व्यक्त केले आहे. पुस्तकाचे संपादन हे गझलकार संदीप बोडके यांनी केले असून महाजन पब्लिकेशन यांनी त्यांचे प्रकाशन केले आहे.

डॉ. लक्ष्मण शिवणेकर म्हणाले की, हा काव्यसंग्रह म्हणजे उपेक्षितांच्या जगण्यातील शैलीचे धगधगते ज्वलंत भूतकाळ, वर्तमानकाळ, भविष्यकाळ अश्या सर्व काळात जगण्याच्या शैलीची रचना काव्यरूपाने कवी उत्तम तरकसे यांनी या काव्यसंग्रहात सादर केल्या आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

हिवाळी पिकांना अवकाळीचा फटका

उरण तालुक्यातील शेतकरी हवालदील

उरण : प्रतिनिधी, वार्ताहर

उरण तालुक्यात अवकाळी पावसाने मंगळवारी रात्री हजेरी लावल्याने येथील शेतकरी वर्गाबरोबर आंबा बागायतदार वीटभट्टी उत्पादक धास्तावले आहेत. दूषित वातावरणामुळे उरण तालुक्यातील शासकीय रुग्णालयात व खासगी दवाखान्यात मोठ्या प्रमाणात रुग्णसंख्येत वाढ दिसून येत आहे. उरण तालुक्यातील काही ठिकाणी मंगळवारी रात्रीपासूनच पावसाने हजेरी लावल्याने वातावरणात पूर्णतः बदल झालेला दिसून येत आहे. गेले चार-पाच दिवस ढगाळ वातावरण या परिसरात दिसून येत होते.

अखेर मंगळवारी रात्री हलक्या पावसाच्या सरी बरसल्या. अचानक पाऊस आल्यामुळे वीट भट्टी व्यवसायिक व आंबा उत्पादक बागायतदार चिंता व्यक्त करत आहेत. वीट भट्टी उत्पादक गोकुळ परदेशी यांच्याशी संवाद साधला असता, अवकाळी पावसाचा दरवर्षी आम्हाला फटका बसतो. आम्हाला आता निसर्गाबरोबर लढण्याची सवय झाली आहे. त्यामुळे धंद्यात फायदा तोटा याचा आम्ही विचारच करत नाही.

दरम्यान, आंब्याच्या झाडांना आता कुठे मोहोर लागण्यास सुरुवात झाली आहे. मोहोर बाहेर पडून, फुललेल्या मोहरावर पाऊस पडल्याने रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच येथील रब्बी हंगामातील वाल, चवळी, मूग, हरभरा आदी कडधान्य पिकांनाही हा पाऊस हानिकारक ठरू शकतो. असे येथील कृषीमित्र शेतकरी प्रफुल्ल खारपाटील, गोपीनाथ गोंधळी, अरुण केणी, कल्पेश म्हात्रे हरिश्चंद्र गोंधळी यांनी सांगितले. त्याचबरोबर येथील शेतकऱ्यांचे भाजीपाल्याचे मळे या पावसामुळे धोक्यात आले असून, या भाजीपाल्यावरही अवकाळी पावसाचा परिणाम होण्याची दाट शक्यता असल्याचे भाजीपाला उत्पादक शेतकरी कृष्णा म्हात्रे यांनी सांगितले. याशिवाय पशुपालक शेतकऱ्यांनी गुरांसाठी राखून ठेवलेला सुकाचारा (पेंढा) भिजून गेला असल्याचे शेतकऱ्यांकडून समजते.

या वेळी कृषी सहाय्यक अधिकारी सुरज घरत यांच्याशी संवाद साधला असता, तालुक्यात कोणत्याही प्रकारचे फारसे नुकसान झाल्याची तक्रार आमच्या कृषी विभागाकडे अजूनपर्यंत आली नसल्याचे त्यांनी सांगितले.

औषधांचा लाभ घेण्याचे आवाहन

शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने म्हणजे ५० टक्के अनुदानाने कडधान्य पिकांवर औषध फवारणी करण्यासाठी रासायनिक औषधे तालुका कृषी विभागाकडून उपलब्ध झाली आहेत. ज्यांनी कडधान्य पिकांची लागवड केली आहे. अशा शेतकऱ्यांनी कडधान्य पिकांवरील फवारणीच्या औषधांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

भाजपच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान

(छाया : योगेश पाटील)

पनवेल : रामप्रहर वृत्त

भारतीय जनता पक्ष पनवेल मंडळाच्या अनुसूचित जाती मोर्चा आणि महिला मोर्चाची कार्यकारणी जाहीर झाली असून या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा नियुक्तीपत्र प्रदान कार्यक्रम बुधवारी (दि. १०) आयोजित करण्यात आला होता. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

भारतीय जनता पक्ष पनवेल मंडळाच्या अनुसूचित जाती मोर्चा आणि महिला मोर्चाची कार्यकारणी उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांच्या सुचनेनुसार अनुसूचीत जाती मोर्चाचे अध्यक्ष रावसाहेब खरात आणि महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्षा राजश्री वावेकर यांनी जाहीर केली आहे. या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा नियुक्तीपत्र प्रदान कार्यक्रम भाजपच्या पनवेल मधील शहर आणि तालुका मध्यवर्ती कार्यालयात प्रदान करण्यात आले.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, अनुसुचीत जाती मोर्चाचे अध्यक्ष रावसाहेब खरात, महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्षा राजश्री वावेकर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, ॲडव्होकेट वृषाली वाघमारे, रुचीता लोंढे, सुलोचना कल्याणकर, सुहासिनी शिवणेकररायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, चिटणीस शिल्पा म्हात्रे, सरचिटणीस सपना पाटील, स्नेहल खरे, सुहासिनी केकाणे, मनिषा चिले यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

या वेळी अनुसूचीत जाती मोर्चाच्या सरचिटणीसपदी निलेश केदारे, उपाध्यक्षपदी संदेश जाधव, अमोल जाधव, चिटणीदपदी सुजित खंडीझोड, रवी रत्नपारखे, संजय कांबळे, सदस्यपदी चित्रा भंडारी, विजय झिरे, आनंद जाधव, संतोस म्हस्के, विजयकुमार जाधव, गोपाळ पट्ठे, रवी मोतलिंग, सुरजित टाक, सर्जेराव सावळे तर महिला मोर्चाच्या सरचिटणीसपदी सपना पाटील, उपाध्यक्षपदी निता मंजुळे, यमुना प्रकाशन, मनिषा बहिरा, चिटणीसपदी प्रणाली म्हात्रे, आशा मुंडे, हेमांगी वाघमारे, कोषाध्यक्षपदी प्रभा सिन्हा, सोशल मिडीयापदी पल्लवी पाटील, सदस्यपदी दिप्ती खिस्मतराव, मधुरा भोसले, श्वेता म्हात्रे, स्नेहा सुर्यकांत, प्रभाग क्रमांक १५ च्या अध्यक्षपदी प्रेमा भोपी, प्रभाग क्रमांक १६च्या अध्यक्षपदी किरण कुशवाह, प्रभाग क्रमांक १७ च्या अध्यक्षपदी मनिषा चिले, प्रभाग क्रमांक १८च्या अध्यक्षपदी संजिवनी खिल्लारे, प्रभाग क्रमांक १९च्या अध्यक्षपदी रूचिता लोंढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पनवेल : वै. हभप गणपतबुवा पाटील यांच्या स्मरणार्थ व श्री गावदेवी क्रिकेट संघ कोप्रोली यांच्या वतीने आमदार चषक २०२४चे आयोजन करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी जि. प. सदस्य अमित जाधव, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, सुनील पाटील, महेश पाटील, धना पाटील आदी उपस्थित होते. आयोजक रोशन पाटील, रमेश पाटील यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

बँकेत केवायसी करण्याचे सांगून लाखोंची फसवणूक

पनवेल : वार्ताहर

ॲक्सिस बँकेतून बोलत असल्याचे सांगून तुमचे केवायसी केले नसल्यामुळे बँक खाते बंद होईल असे फिर्यादीस सांगून स्वतःच्या फायद्याकरिता सात लाख सात हजार २०० रुपये त्याच्या खात्यातून वळते करून सदर तक्रारदाराची फसवणूक केल्याबद्दलचा गुन्हा पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

उदय धाकड यांना एका अनोळखी मोबाईल क्रमांकावरून अनोळखी व्यक्तीने ऍक्सिस बँकेतून बोलत असल्याचे सांगून तुमचे केवायसी केले नसल्यामुळे बँक खाते बंद होईल असे त्यांना सांगून त्यांचा विश्वास संपादन केला. त्यांच्या इमेलवर आलेला ओटीपी संपादन करून त्यांच्या बँक खात्यातून स्वतःच्या फायद्याकरिता अनोळखी व्यक्तीने सात लाख सात हजार २०० रुपये त्याच्या खात्यातून वळते केले. धाकड यांची फसवणूक झाल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

भाजप नेते नासीर शेख यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

पनवेल : रामप्रहर वृत्त

भारतीय जनता पक्ष अल्पसंख्यास मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हा चिटणीस तथा वावंजे ग्रामपंचायतीचे सदस्य नासीर शेख यांचा वाढदिवस बुधवारी (दि. १०) सामाजिक उपक्रम राबवून साजरा झाला. नासीर शेख हे दरवर्षी आपला वाढदिवस सामाजिक उपक्रमांद्वारे साजरा करत असून यंदाच्यावर्षी त्यांनी रक्तदान शिबिर आयोजित केले होते. शिबिराला भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देऊन नासीर शेख यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

शिबिर हेल्पिंग हेंड्स चॅरिटेबल ट्रस्ट वावंजे आणि एम.जी.एम हॉस्पिटल कामोठे यांच्या संयुक्त विद्यामाने अल्पसंख्यास मोर्चाच्या सहकार्याने आणि एकता मुस्लिम सामाजिक संस्थेच्या वतीने वावंजे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हे शिबिर घेण्यात आले असून याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, वावंजे पंचायत समितीचे विभागीय सरचिटणीस प्रकाश खैरे, बुथ अध्यक्ष सचिन पाटील, उल्हास पाटील, अरुण थळे, संजय मोगरे, अरुण चोरमेकर, जगन धोंमडे, हरफान शेख, नदिम शेख, भरत पालकर, कान्हा फडके, हरेश पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

संजय पवार पुरस्काराने सन्मानित

पनवेल : वार्ताहर

ऑल इंडिया सीफेरर्स युनियनचे अध्यक्ष, छत्रपती शिवाजी महाराज कामगार सेनेचे अध्यक्ष संजय वासुदेव पवार यांना राज्यस्तरीय शिवमावळे समाजरत्न पुरस्कार २०२४ने सन्मानित करण्यात आले.

ऑल इंडिया सीफेरर्स युनियनचे अध्यक्ष, छत्रपती शिवाजी महाराज कामगार सेनेचे अध्यक्ष संजय पवार यांनी महाराष्ट्रमध्ये कामगारांसाठी केलेल्या कार्याची पोचपावती त्याचप्रमाणे समुद्रामधील खलश्यांसाठी केलेले कार्याची दखल घेऊन त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिवमावळे सामाजिक सेवा संघाच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त संस्थापक अध्यक्ष दिनेश घोलप, उपाध्यक्ष पुरुषोत्तम घाग यांच्या नेतृत्वाखाली हा पुरस्कार त्यांना देण्यात आला.

पनवेल तहसीलकडून शिबिरांना प्रतिसाद

केंद्रीय योजनांच्या अंमलबजावणी भर

पनवेल : वार्ताहर

प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्यास अभियान यशस्वी करण्यासाठी पनवेल तहसीलकडून विविध शिबिरे घेण्यात येत आहेत. या योजनांमुळे पनवेल परिसरातील आदिवासी कल्याणकारी योजनांची यशस्वी अंमलबजावणी झाली असून तहसील विभागाकडून ही नवीन वर्षाची भेटच असल्याची भावना आदिवासींमध्ये आहे.

पनवेल तहसील कार्यक्षेत्रात सध्या शिबिरांमधून आदिवासी बांधवांना आधारकार्ड काढणे, जन धन बँक खाते उघडून त्याला आधारकार्ड लिंक करणे, आयुष्यमान भारत कार्ड, किसान सन्मान निधी, जातीचे प्रमाणपत्र काढणे, घरकुल योजना या सारख्या प्रमुख योजनांची माहिती तसेच लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन केले जात आहे. याच अनुषंगाने नुकतीच पनवेल तालुक्यात सुरू असलेल्या विविध शिबिरांचा आढावा घेण्यात आला.

या वेळी आदिवासी प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, तहसीलदार विजय पाटील, गटविकास अधिकारी संजय भोये, महसुल नायब तहसीलदार राजश्री जोगी, निवासी नायब तहसीलदार संभाजी शेलार यांची उपस्थिती होती. योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.

> **प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्यास अभियान यशस्वी करण्याकरिता पनवेल तहसीलच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर शिबिरे घेण्यात येत आहेत. या शिबिरांमधून शासनाच्या प्रमुख योजनांचा लाभ कसा घ्यावा, याबाबत मार्गदर्शन केले जात आहे.**
>
> **– विजय पाटील, तहसीलदार, पनवेल**

पनवेलमध्ये जेनेरिक औषधे मिळणार

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल महापालिकेची सध्या १४ आरोग्य मंदिरांमधून वैद्यकीय सेवा दिली जात आहे. याच आरोग्य मंदिरातून लवकरच जेनेरिक औषधे रुग्णांना दिली जाणार आहेत. याबाबत राज्य सरकारने डिसेंबर महिन्यात शासननिर्णय घेतला होता. याच निर्णयानंतर पनवेल महापालिकेकडून प्रत्येक आरोग्य मंदिरामध्ये जेनेरिक औषधांचे दुकान सुरू करण्यासाठी चाचपणी सुरू केली आहे.

राज्य सरकारने नॅकोफ इंडिया लिमिटेड या कंपनीला पालिकेच्या दवाखान्याच्या परिसरात अमृत स्टोअर्स या धर्तीवर जेनेरिक औषधांचे दुकान सुरू करण्याची सूचना केली आहे. या दुकानांमध्ये रुग्णांना बाजारमूल्यापेक्षा ५ टक्के सवलत औषधांवर देणे बंधनकारक राहणार आहे. सध्या पनवेल महापालिकेचे वैद्याकीय आरोग्य विभागातील अधिकारी पालिकेच्या १४ विविध आयुष्यमान आरोग्य मंदिरांच्या परिसरात हे औषध दुकान सुरू करता येईल का यासाठी प्रत्येक आरोग्य मंदिराला भेट देऊन जागेची तजवीज करत आहेत.

पनवेल : तळोजे मजकुरचे माजी सरपंच संतोष पाटील यांना वाढदिवसानिमित्त भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी महेश पाटील, रवींद्र पाटील, दिनेश फडके, पिंटू म्हात्रे आदी उपस्थित होते.

सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय प्लास्टिक पुनर्वापर योद्धा स्पर्धेत सहभागी

पनवेल : रामप्रहर वृत्त

उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात प्लास्टिकचा पुनर्वापर या विषयावर उदबोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी खारघर येथून प्लास्टिक पुनर्वापर योद्धा समितीच्या सदस्या निहारीका प्रसाद यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.

निहारिका मॅडम यांनी देशांमध्ये असणारे प्लास्टिकची समस्या ती वाढत असल्याची कारणे आणि त्यामुळे भविष्यात निर्माण होणारे गंभीर परिणाम यांचे जाणीव एल.सी.डी. प्रोजेक्टर च्या साह्याने विद्यार्थ्यांना दिली.त्यांच्या या उपक्रमात उतरण्याचे विद्यालयाचे मुख्याध्यापक डी.जी. हजारे यांनी जाहीर केले

विद्यार्थ्यांनीदेखील या उपक्रमात सहभागी होण्याची ग्वाही दिली व ३० जानेवारीपर्यंत तयार होणारा प्लॅस्टिक कचरा एकत्र करून प्लास्टिक निर्मूलन योद्धा स्पर्धेत उतरण्याचे ठरविले. ही स्पर्धा विद्यालयामध्ये राबविण्यासाठी विद्यालयाच्या गुरुकुल प्रमुख, रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक डी.जी.हजारे यांचे मार्गदर्शन लाभले.

प्लास्टिकची समस्या या सामाजिक समस्येचे निराकरण करण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या स्पर्धेमध्ये विद्यालयाने सहभाग दर्शविल्याबद्दल विद्यालयाचे चेअरमन शरद खारकर यांनी सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले.

संपादकीय

विजय सत्याचाच

खरी शिवसेना एकनाथ शिंदे यांचीच ठरते असा ऐतिहासिक निकाल देत, शिंदे गटाने नेमलेले भरत गोगावले यांची प्रतोदपदी झालेली निवड विधानसभाध्यक्षांनी वैध ठरवली, तसेच शिंदे गटाच्या १६ आमदारांना अपात्र ठरवता येणार नाही असा निर्वाळाही दिला. एकंदरीत सगळाच निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारच्या वैधतेवर शिक्कामोर्तब करणारा ठरला आहे. ठाकरे गटाला हा जबरदस्त धक्का आहे यात शंकाच नाही.

सुमारे वीस महिन्यांपूर्वी म्हणजेच २१ जून २०२२ रोजी महाराष्ट्रात जे राजकीय महानाट्य सुरू झाले, त्याचा अखेरचा पडदा पडला आहे. महानाट्याचा शेवट गोड झाला असून यापुढे तरी शिवसेना कोणाची याचे उत्तर मागत कोणी दारोदार फिरू नये. शिवसेनेचे धडाडीचे नेते एकनाथ शिंदे यांनी आपल्यासह ४० शिलेदारांना साथीला घेऊन वीस महिन्यांपूर्वी उठाव केला. त्या उठावानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात प्रचंड उलथापालथी झाल्या. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या लोकशाहीविरोधी धोरणांना आव्हान देत शिंदे यांनी सत्तापालट घडवून आणला. भारतीय जनता पक्षासारखी महाशक्ती त्यांच्या साथीला होती म्हणूनच मुख्यमंत्रीपदी शिंदे हेच विराजमान झाले. ज्यांच्या विरोधात निवडणुका लढल्या, त्यांच्याच मांडीला मांडी लावून सत्तेत बसलेल्या उद्धव ठाकरे यांना पायउतार होण्याची पाळी आली. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. १६ आमदारांच्या अपात्रतेप्रकरणी विधानसभाध्यक्षांनीच न्यायदानाचे काम करावे आणि हा राजकीय तिढा सोडवावा असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने जारी केल्यानंतर आजचा सोनियाचा दिवस उजाडला. विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी निष्णात न्यायाधीशाप्रमाणे अचूक शब्दांमध्ये बुधवारी यासंदर्भात अंतिम निकाल दिला. विधिमंडळाचे मध्यवर्ती सभागृह यावेळी उभय बाजूंच्या वकिलांच्या फौजांनी आणि आमदार प्रतिनिधींनी फुलून गेले होते. निकालपत्र देताना विधानसभाध्यक्ष नार्वेकर यांनी अनेक घटनात्मक मुद्यांकडे लक्ष वेधले. शिवसेना कोणाची या प्रश्नाचे उत्तर पक्षाच्या घटनेतच शोधावे लागते. १९९९ साली शिवसेनेने जी घटना केंद्रीय निवडणूक आयोगाकडे सादर केली होती, तीच ग्राह्य मानावी लागेल. २०१८ साली पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केलेले घटनेतील बदल सरसकट अवैध आहेत असे प्रतिपादन त्यांनी केले. पक्षप्रमुखाला एकट्याला कोणालाही थेट पक्षातून काढता येत नाही. त्यासाठी राष्ट्रीय कार्यकारिणीशी सल्लामसलत करावीच लागते. पक्षप्रमुखाच्या विरोधात मत नोंदवणे हा जर का गुन्हा असेल तर तो लोकशाहीविरोधी मानला पाहिजे. ठाकरे गटाचे निर्णय लोकशाहीमूल्यांना अनुकूल नाहीत असेही त्यांनी निकालपत्रात म्हटले आहे. ज्या प्रतिनिधीसभेस शिंदे गटाचे १६ आमदार गैरहजर राहिले व त्या गैरहजेरीमुळेच त्यांच्यावर पक्षविरोधी कारवायांचा ठपका ठेवण्यात आला, ती प्रतिनिधीसभा बोलावणारे सुनील प्रभू त्यावेळी पक्षाचे प्रतोदच नव्हते, त्यामुळे त्यांना अशी सभा बोलावण्याचा अधिकारच नव्हता, या वस्तूस्थितीवर विधानसभाध्यक्षांनी बोट ठेवले. या परखड अशा ऐतिहासिक निकालामुळे शिंदे गटाच्या १६ आमदारांवर टांगती असलेली अपात्रतेची तलवार आता अदृश्य झाली आहे. भरत गोगावले यांची प्रतोदपदी झालेली निवड वैध ठरली आहे आणि खरा शिवसेना पक्ष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सुरक्षित आहे, असा या निकालाचा सारांश म्हणता येईल. शिंदे सरकारला ठाकरे गटाचे नेते आधीपासून घटनाबाह्य सरकार असे हिणवत होते. या निकालामुळे त्यांचा मुखभंग झाला आहे. प्रदीर्घ लढाईनंतर अखेर सत्याचाच विजय झाला असे म्हणता येईल.

माथेरानमधील ऐतिहासिक रामबाग रस्ता

माथेरान या जागतिक दर्जाच्या थंड हवेच्या ठिकाणाचा शोध ब्रिटिश गव्हर्नर मॅलेट यांनी १८५०मध्ये लावला. त्या वेळी माथेरानच्या वरच्या भागात बांधलेले बंगले यांच्यासाठी लागणाऱ्या वस्तूंची ने-आण ज्या रस्त्याने झाली तो रामबाग पॉईंट रस्ता शासनाने पर्यायी रस्ता म्हणून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत विकसित करण्याची गरज निर्माण झाली आहे.

१९७४पर्यंत म्हणजे १२५ वर्षे वापरात असलेला रामबाग पॉईंट रस्ता नेरळ-माथेरान घाट रस्त्याची निर्मिती झाल्यानंतर विस्मृतीत गेला आहे. आदिवासी लोक या रस्त्याचा आजही वापर करीत आहेत. राज्याच्या रस्ते विकासात नोंद असलेल्या माथेरानच्या या पर्यायी मार्गाची निर्मिती माथेरानचा पर्यटन व्यवसाय वाढविणारा ठरणार आहे. माथेरानच्या रामबाग पॉईंटच्या पायथ्याशी राज्य परिवहन मंडळाची एसटी येत असल्याने पाच किमीचा पक्का रस्ता निर्माण केल्यास माथेरान हे थंड हवेचे ठिकाण मुंबईच्या आणखी जवळ येऊ शकते.

ब्रिटिशांनी माथेरानचा शोध लावला तेव्हा चौक-कर्जत रस्त्यावरील बोरगाव-सोंडेवाडी या पायवाटेने माथेरानचा पायथा गाठला होता. पुढे माथ्यावरील त्या थंड हवेच्या रानात पोहचण्यासाठी ब्रिटिशांनी जो मार्ग अवलंबिला तो मार्ग होता सध्याचा रामबाग पॉईंट. माथेरानमध्ये १८५०मध्ये मुंबई प्रांताचे गव्हर्नर असलेले मॅलेट यांनी माथेरानमधील पहिला बंगला बांधला. तो बाईक हा बंगलादेखील याच रामबाग पॉईंट च्या रस्त्यावर आहे. त्या वेळी ब्रिटिशांनी माथेरानच्या पश्चिमेला अनेक बंगले बांधले, त्या सर्व बंगल्यांसाठी लागणारे बांधकाम साहित्य आणि त्या बंगल्यामध्ये राहण्यासाठी ये जा बोरगाव भागातून सोंडेवाडी आणि तेथून रामबाग पॉईंट या रस्त्याने केली होती.

माथेरानच्या वन ट्री हिल पॉईंटपर्यंत या रस्त्यावर त्याकाळी ब्रिटिशांनी काही किमीची दगडी पायवाटदेखील बांधली होती. ती साधारण पाच ते सात फूट रुंदीची पायवाट अस्तित्वात आहे. शासनाने माथेरानसाठी पर्यायी रस्त्याची निर्मिती करण्याचा निर्णय घेतल्यास सोंडेवाडी ते रामबाग पॉईंट हा जेमतेम सहा ते सात किमीचा रस्ता मजबूत करावा लागणार आहे.

दुसरीकडे बोरगावपासून पुढे माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या सोंडेवाडीपर्यंत एसटी गाडी येते. त्यामुळे ब्रिटिशांनी किमान ९५ वर्षे वापरलेला आणि पुढे नेरळ -माथेरान घाटरस्ता निर्माण होण्यासाठी सर्व ज्या रस्त्याचा वापर करीत आहेत तो रस्ता तयार करण्याची मागणी नितीन विश्वनाथ सावंत यांनी केली आहे. माथेरानच्या या पर्यायी रस्त्यासाठी गेली अनेक वर्षे पाठपुरावा सावंत करीत आहेत. ७ जानेवारी रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कर्जत येथे आले असताना मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी त्यांना निवेदन दिले.

शासनाला अत्यंत कमी खर्चात माथेरानला पोहचण्यासाठी पर्यायी मार्ग सापडला असून मुंबई आणि पुणे ही महानगरे या रस्त्याने आणखी जवळ येऊ शकतात. वेळेची, इंधनाची बचत करणारा हा पर्यायी मार्ग माथेरानमधील व्यापार, उद्योग वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. माथेरानमध्ये वाहनांना असलेली बंदी लक्षात घेता, ब्रिटिश वापरत असलेला तो रस्ता पर्यायी मार्ग म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेतल्यास वनट्री हिल भागात नवीन दस्तुरी नाका निर्माण होऊ शकतो.

पायथ्याशी येते एसटी

माथेरानमधील रामबाग पॉईंटच्या पायथ्याशी असलेल्या आदिवासीवाड्यांमधील लोकांसाठी राज्य परिवहन मंडळाची सेवा सुरू आहे. तेथपर्यंत आलेला डांबरी रस्ता आणि या डांबरी रस्त्यावरून कर्जत-बोरगाव-पोखरवाडीमार्गे ताडवाडी अशी एसटी सेवा सुरू असताना त्या भागातील आदिवासी लोक दररोज माथेरानला चालत येत असतात.

ब्रिटिशकालीन रस्त्याची सुरुवात पुढे कायम असल्याने आणि रस्ता अस्तित्वात असल्याने माथेरान हे पर्यटनस्थळ मुंबईच्या आणखी जवळ आणण्यासाठी हा पर्यायी मार्ग सुरू करावा, अशी मागणी पंचक्रोशीतील आदिवासी नेहमी करीत असतात.

-विजय मांडे, कर्जत

नैसर्गिक आपत्ती कोसळल्यास संकटकालीन उत्तम पर्याय, माथेरानच्या पार्किंगचे विकेंद्रीकरण, पर्यटन वाढ, सर्वांगीण विकास, भावी पिढीचे उज्ज्वल भविष्य, आदिवासी उन्नती व कल्याण, प्रवाश्यांचा वेळ, श्रम, इंधन, पैसे व खर्च बचत याबरोबरच शासनाच्या कमी निधीचा वापर होऊन लवकर तयार करता येण्याजोगा 'रामबाग रस्ता हा माथेरानसाठी रामबाण उपाय ठरेल'. म्हणून हा रामबाग रस्ता होणे ही तातडीची, निकडीची आणि काळाची गरज निर्माण झाली आहे.

-नितीन सावंत, सदस्य, वन संवर्धन

पर्यायी मार्गामुळे होणारे फायदे :

१) पार्किंग सोपी होऊन विकेंद्रीकरण होईल

२) आदिवासी बांधवांचा आर्थिक उन्नती व विकास घडेल.

३) माथेरानच्या पर्यटनात आमूलाग्र वाढ होईल.

४) माथेरानला मुंबई,पुण्यावरून येणाऱ्या रस्त्याचे अंतर २५ ते ४० किमीने कमी होईल.

५) पर्यायी मार्ग मुंबई-पुणे महामार्गाला जोडला गेल्यामुळे दळणवळण सोपे होईल.

६) भविष्यात काही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास संकटकालीन रस्ता म्हणून उपयोगी ठरेल.

बदलते तंत्रज्ञान

व्हॉट्सॲपने आणले प्रायव्हसी चेकअप फीचर

जगभरातील लाखो लोक व्हॉट्सॲप हे मेसेजिंग ॲप वापरतात. लोक त्याचा वापर चॅट करण्यासाठी, फोटो आणि व्हिडीओ शेअर करण्यासाठी करतात. मेटा आपल्या या मेसेजिंग प्लॅटफॉर्मची सुरक्षा आणि प्रायव्हसी वाढवण्यावर सतत भर देत आहे. अलिकडच्या काही महिन्यांत, कंपनीने अनेक नवीन फीचर्स लॉंच केले आहेत, परंतु बऱ्याच युजर्सना त्याच्याबद्दल माहीत नाही.



व्हॉट्सॲपने अलिकडेच एक प्रायव्हसी चेकअप फीचर सादर केलं आहे, जे युजर्ससाठी खूप उपयुक्त ठरू शकते. हे फीचर युजर्सना व्हॉट्सॲप सेटिंग्जमधील सर्व प्रायव्हसी सेटिंग्ज सहजपणे रिव्यू आणि मॅनेज करण्याची परवानगी देते. त्याच्या मदतीने, युजर्स त्यांची माहिती कोण पाहू शकतात हे नियंत्रित करू शकतात. यासाठी प्रायव्हसी सेटिंग्जमध्ये स्टार्ट प्रायव्हसी चेकअपवर क्लिक करावे लागेल. येथे तुम्हाला अनेक स्क्रीनवर नेले जाईल जिथे तुम्ही निवडू शकता की तुमच्याशी कोण संपर्क साधू शकते, तुम्हाला ग्रूपमध्ये जोडू शकतो आणि तुमचे ब्लॉक केलेले संपर्क मॅनेज करू शकतो. तुम्ही तुमची वैयक्तिक माहिती एडीट करू शकता, जसे की तुमचा प्रोफाइल फोटो, लास्ट सीन आणि ऑनलाइन स्टेटस आणि रिड रिसिप्ट्स. याव्यतिरिक्त, डिसएपियरिंग मेसेज सेटअप करून आणि एंड-टू-एंड एनक्रिप्टेड बॅकअप इनेबल करून तुम्ही तुमच्या चॅट आणि ग्रुपमध्ये अधिक प्रायव्हसी जोडू शकता.

अनोळखी कॉलर्सना गप्प करा : यासाठी आधी व्हॉट्सॲप ओपन करा आणि सेटिंगमध्ये जा. अकाऊंट ऑप्शनवर क्लिक करा आणि प्रायव्हसीवर टॅप करा. खाली स्क्रोल करा आणि ब्लॉक केलेला संपर्क निवडा. यानंतर वरच्या उजव्या कोपऱ्यात ॲडवर क्लिक करा. यानंतर अनोळखी कॉलर निवडा आणि ब्लॉकवर क्लिक करा.

स्क्रीन लॉक इनेबल करा : यासाठी व्हॉट्सॲप उघडा आणि सेटिंग्जवर जा. यानंतर अकाउंट ऑप्शनवर क्लिक करा आणि प्रायव्हसीवर जा. खाली स्क्रोल करा आणि स्क्रीन लॉक टॅप करा. अनलॉक करण्यासाठी येथे आवश्यक फेस आयडी/टच आयडी टॉगल ऑन करा. स्क्रीन लॉक होण्यापूर्वी व्हॉट्सॲप बंद केल्यानंतर किती वेळ जावा हेदेखील तुम्ही निवडू शकता.

ज्ञानपीठ विजेते साहित्यिक वि. स. खांडेकर

निमित्त

मराठी कथा, कादंबरीकार म्हणून सर्वांनाच परिचित असणारे नाव म्हणजे वि. स. खांडेकर. भारतात साहित्य क्षेत्रात सर्वोच्च असा समजला जाणारा पुरस्कार म्हणजे ज्ञानपीठ पुरस्कार. सगळ्यात आधी मराठी साहित्याला हा पुरस्कार प्राप्त झाला तो १९७४ साली वि. स. खांडेकरांच्या ययाती या कादंबरीच्या माध्यमातून.

विष्णू सखाराम खांडेकर असे त्यांचे पूर्ण नाव. त्यांचा जन्म ११ जानेवारी १८९८ रोजी सांगली येथे झाला. शालेय जीवनात त्यांना वाचनाची आवड तर होतीच, पण त्याचबरोबर नाटकात काम करणे, नाटकाचे दिग्दर्शन करण्याचीही त्यांना आवड होती. पुढे पुणे येथे इंटर आर्ट्सपर्यंतचे त्यांचे शिक्षण झाले. त्यानंतर १९२०मध्ये त्यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिरोडे येथे प्रथम शिक्षक आणि नंतर मुख्याध्यापक म्हणून नोकरी केली. त्यांचे लेखन १९१९पासून प्रकाशित होऊ लागले. त्यामध्ये कविता, विनोदी लेख इत्यादी साहित्य असे.

उत्तरोत्तर खांडेकर यांचे साहित्य आणखी बहरत गेले. त्यांच्या बहुतेक साहित्यकृतींच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. गुजराती, तमिळ, हिंदी आदी भाषांमध्ये त्यांच्या अनेक कादंबऱ्यांचे अनुवाद झालेले आपल्याला दिसतात. त्यांच्या काही कथांची भाषांतरे तर ही इंग्रजी आणि रशियन भाषांतून झालेली आहेत. जीवन व कला यांना वाहिलेल्या ज्योत्स्ना या मासिकाचे ते संपादकही होते. १९६१मध्ये महाराष्ट्र सरकारकडून देण्यात येणाऱ्या कादंबरी विभागाचे पहिले पारितोषिक त्यांच्या ययाती कादंबरीस देण्यात आले. त्याच वर्षी साहित्य अकादमीचा पुरस्कारही या कादंबरीस मिळाला.

१९४१मध्ये सोलापूर येथे झालेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे खांडेकर हे अध्यक्षही राहिले आहेत. १९६८मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. १९७४ साली मराठी साहित्यात मानाचा तुरा खोवला गेला. याच वर्षी वि. स. खांडेकर यांच्या ययाती या कादंबरीला साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च असा ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. मराठी साहित्याला मिळालेला हा पहिला सर्वोच्च सन्मान आहे. ययातीच्या माध्यमातून भोगवादावर केलेले भेदक भाष्य तसेच जीवन जगण्याचे अंतिम तथ्य आणि शेवटी असणारे अंतिम सत्य याचे फार सुंदर आणि मार्मिक लिखाण आणि त्यातील आशय या कादंबरीमधून आपल्याला पाहायला मिळतो. त्यातील संदर्भ आणि आशय आजच्या आधुनिक जगालाही तंतोतंत लागू पडतो. त्यांनी ययाती कादंबरीसह जवळपास १६ कादंबऱ्यांचे लिखाण केले.

खांडेकर यांचे अनेक कथासंग्रह, रूपककथा संग्रह, लघुकथासंग्रह इत्यादी साहित्य प्रसिद्ध आहे. लालित्यपूर्ण भाषा, रम्य कल्पना, कोटीबाजपणा व समाजहिताचा प्रचार ही त्यांच्या लिखाणाची वैशिष्ट्ये राहिली आहेत.

उत्तरार्ध आयुष्यात अंधत्व आल्यानंतरही त्यांनी साहित्याची कास सोडली नाही, पण एकाकी जीवन आणि अंधत्वामुळे आलेले परावलंबित्व याची सल त्यांच्या मनाला वाटत असे.

२ सप्टेंबर १९७६ रोजी मिरज येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या साहित्यातून समाजाप्रती असलेली त्यांची जाणीव, कणव, अन्याय अत्याचारविरोधात त्यांनी उठवलेला आवाज आपल्याला दिसून येतो. त्यांच्या लेखनात माणुसकीचा गहिवर उमटून दिसतो. त्यांनी वृत्तपत्रीय लेखनात व ग्रंथ संपादनात आपला ठसा उमटवला. (साभार : इंटरनेट)

क्लिक...क्लिक...!

नागोठणे : वाकण, सुकेळी भागातील रस्त्याने येणाऱ्या -जाणाऱ्या प्रवाशांना धुळीचा खूपच त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्याचे काम या रस्त्याचे काम त्वरित मार्गी लावावे, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

आरोग्य प्रहर

किडनी स्टोन दूर करण्यासाठी घरगुती उपाय

अलिकडे वेगवेगळ्या चुकीच्या सवयी आणि चुकीच्या खाण्या-पिण्यामुळे लोकांना किडनी स्टोनची समस्या होऊ लागली आहे. या वेदनादायी समस्येमुळे लोक हैराण झालेले असतात. किडनी स्टोनच्या उपचारासाठी अनेक प्रकारची औषधे बाजारात आहेत. त्यासोबतच ऑपरेशन करुनही ही समस्या दूर केली जाऊ शकते, मात्र काही असेही घरगुती उपाय आहेत ज्यांद्वारे किडनी स्टोनची समस्या दूर केली जाऊ शकते. चला जाणून घेऊया किडनी स्टोनवर काही घरगुती उपाय...

वर्षानुवर्षे लिंबूचा रस आणि ऑलिव्ह ऑईल मिश्रित करुन गॉलब्लेडरच्या स्टोनसाठी सेवन केले जाते, पण हा उपाय किडनी स्टोनसाठीही फायदेशीर आहे. लिंबाच्या रसात असलेले सॅट्रिक ॲसिडमध्ये कॅल्शिअम बेस असलेल्या स्टोनला तोडण्याची क्षमता असते आणि पुन्हा स्टोन तयार होऊ देत नाही. हे मिश्रण तयार करण्यासाठी लिंबाचा रस आणि ऑलिव्ह ऑईल समान प्रमाणात मिश्रित करा आणि दिवसातून तीन वेळा याचे सेवन करा.

डाळिंबाचा रस आणि बीयांमध्ये ॲस्ट्रीजेंट गुण असतात. जे किडनी स्टोनवर उपचारासाठी फायदेशीर असतात. जर तुमच्या किडनीमध्ये स्टोन असेल तर रोज एक डाळिंब खावे किंवा त्याचा रस फायदेशीर होऊ शकतो. यासोबतच डाळिंबाला फ्रूट सॅलडमध्येही मिश्रित करून खाऊ शकता.

मॅग्नेशिअम, फॉस्फेट्स, कार्बोनेट आणि कॅल्शिअमपासून तयार झालेल्या किडनी स्टोनच्या उपचारासाठी कलिंगड फारच उपयुक्त आहे. कलिंगडामध्ये मोठ्या प्रमाणात पोटॅशिअम असतं, जे किडनीसाठी फारच उपयुक्त आहे. पोटॅशिअम लघवीतील ॲसिड लेव्हल नियंत्रित ठेवण्यासाठी मदत करते. पोटॅशिअमसोबतच कलिंगडामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी असते, यामुळे स्टोन नैसर्गिक पद्धतीने शरीराबाहेर काढला जाऊ शकतो.

राजम्यामध्ये अधिक प्रमाणात फायबर असतात. याला किडनी बिन्स नावानेही ओळखले जाते. राजमा किडनी आणि ब्लेडरशी संबंधित वेगवेगळ्या आजारांवर उपाचारासाठी फायदेशीर आहे. ज्या पाण्यात राजमा भिजवून ठेवला असेल ते पाणी प्यायल्यासही फायदा होतो.

'जंजिऱ्या'च्या डागडुजीला प्रारंभ

पुरातत्व विभाग करणार तटबंदी मजबूत

मुरूड : रामप्रहर वृत्त

राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यातील तोफा गंजल्याने तसेच तटबंदीचे दगड हा झिजू लागल्याने त्याच्या डागडुजीचे काम पुरातत्व विभागाने हाती घेतले आहे. किल्ल्याच्या संवर्धनासाठी तटबंदीवरील चिऱ्यांवर रासायनिक प्रक्रिया करण्यात येत आहे. यामुळे इतिहासप्रेमी व पर्यटकांनी पसंती दर्शविली आहे.

दरम्यान, किल्ल्याच्या आतील तटबंदीचे दगड व तोफा ना रासायनिक केमिकल लावण्यास सुरुवात केली आहे. हे काम पुरातत्व विभागातर्फे करण्यात येत असून, स्थानिक एकदरा गावातील कोळी मुलांना हे काम देण्यात आले आहे. डागडुजीनंतर ऐतिहासिक जंजिरा किल्ला नव्याने पाहायला मिळणार आहे.

याबाबत पुरातत्व विभागाचे सहाय्यक संवर्धक अधिकारी बजरंग येलीकर यांना विचारणा केली असता, ते म्हणाले की, तटबंदी करताना वापरलेले दगड झिजले असून, तसेच किल्ल्यावरील

तोफाही गंजल्याने केमिकल ब्रँचतर्फे वास्तुसंवर्धनासाठी केमिकल उपचार सुरू केले आहे. यामुळे किल्लाचे आयुष्य वाढेल. हे काम एकदरा गावातील शिवम मकु व त्यांच्या १५ सहकाऱ्यांना दिला आहे. यामधून त्यांना चांगला रोजगार मिळाला आहे.

दरम्यान, पद्मदुर्ग किल्ल्याचे संवर्धन कधी होणार, असा प्रश्न श्री. येलीकर यांना विचारण्यात आला. त्यावेळी त्यांनी सांगितले की, पद्मदुर्ग किल्ला संवर्धनाचे कामही लवकरच हाती घेण्यात येईल. यामध्ये दोन दरवाजे, वॉटर टायकिंग व डागडुजी केली जाईल.

खालापूरात ट्रकची गॅस बल्करला धडक

खालापूर : प्रतिनिधी

भरधाव वेगात गॅस बल्करला धडक दिल्याप्रकरणी ट्रक चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बल्कर ट्रक (एम.एच.-१४-के.क्यु.१०८१) हा एल.एन.जी. गॅस इंधन भरून, सावरोली महानगर ग्रॅस पंपासमोर साईटपटटीवर उभा होता. त्याच दरम्यान पेण बाजुकडुन खालापूर बाजुकडे जाणारा ट्रक (एम.एच.-४६ बी.एफ.१२१५) या वरील चालकाची उभ्या असलेल्या बल्कर ट्रकला ठोकर बसली. गॅस बंद कर ट्रक मधून गळती होऊ नये यासाठी तातडीने पोलीस, देवदूत पथक, अपघातग्रस्त मदत पथक घटनास्थळी पोहचले होते.

रसायनतज्ञ धनंजय गीध खालापूर पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांनी परिस्थिती नियंत्रण येईपर्यंत वाहतूक बंद ठेवली होती. याबाबत धडक देऊन अपघात करणाऱ्या ट्रकचालकाविरोधात खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास सुरू आहेत.

चौकमधील वाहतूक कोंडी सुटेना

चौक : प्रतिनिधी

चौक गावातून जाणारी एकमेव एसटी चौक वाहतूक कोंडीला कंटाळली असून कोंडीचे ग्रहण लवकरात लवकर सोडविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात असणारे चौक हे ऐतिहासिक गाव, सद्या वाहतूक कोंडीच्या चर्चेने, चर्चेत आले आहे. बेशिस्त वाहान पार्कींग, अनधिकृत बांधकामे, रस्त्यावर बिल्डिंग मटेरियल टाकणे, फेरीवाले, गावठी भाजीपाला विक्रेते यांना जागा नसल्याने त्यांनी रस्त्याच्या कडेला बसणे अशी अनेक कारणे आहेत. याच कारणाने चौक गावातून जाणाऱ्या अलिबाग, पनवेल, उरण, पेण या एसटी गाड्या बंद झाल्याने प्रवाशी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार येथे येऊन पुढील प्रवासासाठी जातात, पण खोपोली वरून सावरोली, वडगाव मार्गे कर्जत या गाडीला कर्जतला जाण्यासाठी चौक शिवाय पर्याय नाही.

चौक तुपगाव कॉर्नर येथे अनधिकृत बसलेले भाजी विक्रेते, रस्त्याच्या कडेला असलेला विद्युत खांब, वळणावर उभ्या केलेल्या दुचाकी गाड्या यांच्यातून मार्ग काढताना नाकी नऊ येत आहे. पुन्हा कॉर्नर ते चौक गावातून बाहेर पडे पर्यंत वाहतूक कोंडीने एसटी चालक हैराण होत आहेत. या एस टी गाडीने अनेकजण कर्जतकडे रवाना होतात, तर महिला यांचाही प्रवास वाढला असुन त्यांची गर्दी असते.

चौक गावातून बाहेर पडेपर्यंत कुणा तरी समाजसेवक अथवा कार्यकर्त्याला हा रस्ता मोकळा करून देण्यासाठी आपला अनमोल वेळ खर्च करावा लागत आहे.

नेरळ पोलीस ठाण्याची आयएसओ मानांकनाकडे वाटचाल सुरू

कर्जत : प्रतिनिधी

रायगड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्याच्या इमारती आकर्षक करण्याच्या सूचना सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांना दिल्या होत्या. त्यात काही ठराविक बाबींवर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यात एक संगती ठेवण्याचा प्रयत्न जिल्हा पोलीस अधीक्षकांचा होता. त्यातून नेरळ पोलीस ठाणे यांनी सर्व बाबींमध्ये भारीभव कामगिरी करीत आयएसओ मानांकन मिळविण्यासाठी आपली वाटचाल सुरू केली आहे.

जिल्ह्यातील ठाणे जिल्ह्याच्या हद्दीवर असलेले नेरळ पोलीस ठाणे हे उपनगरीय लोकलने जोडले असल्याने महत्वाचे पोलीस ठाणे आहे. त्यात नेरळ पोलीस ठाणे हद्दीच्या बाजूला ठाणे जिल्ह्याच्या शेवटच्या टोकाचा परिसर असल्याने मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक त्या परिसरात

राहतात आणि गुन्हे करून कर्जत तालुका हद्दीत लपून राहतात. कधी कधी ठाणे जिल्ह्यातील सराईत गुंड हे कर्जत तालुका हद्दीत गुन्हे करून ठाणे जिल्ह्यात पसार होत असतात. त्यामुळे सर्व दृष्टीने महत्वाचे असलेले नेरळ पोलीस ठाण्याची सध्याची वास्तू ही तिसरी ठिकाणी स्थलांतरित केलेली वास्तू आहे.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणी हायटेक करण्याची सूचना केल्यानंतर जिल्ह्यातील सर्व २७ पोलीस ठाणी कामाला लागली होती. नेरळ पोलीस ठाणे यांच्या प्रभारी अधिकारी यांच्याकडून आपल्याला मिळालेल्या मोठ्या जागेचा फायदा घेण्यासाठी सर्व काही सुटसुटीत व्हावे यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यानंतर नेरळ पोलीस ठाण्याच्या दुमजली इमारतीत आणखी नवीन बांधकामे वेळेत पूर्ण करून त्या ठिकाणी जुन्या कागदपत्रांच्या सुरक्षेसाठी पुणे येथून नवीन कपाटे आणण्यात आली.

पोलीस ठाण्याची हद्द ज्या ठिकाणी संपते त्या नेरळ पोलीस ठाणे हद्दीची माहिती देणारे फलक उभे राहिले आहेत. ते फलक नेरळ कशेळे, नेरळ कर्जत, नेरळ कल्याण आणि नेरळ कळंब मुरबाड या रस्त्यावर लावले गेले आहेत. तर मुख्य इमारतीच्या बाहेर तारांकित हॉटेल यांना लाजवेल अशी गेट आणि बाहेरच्या बाजूला दगडी कुंपणाला लागून झाडे लक्ष वेधून घेतात. तर इमारतीमधील सर्व खोल्यांमधील फलक हे दोन विशेष रंगांनी बनवले गेले असल्याने त्याची देखील रंगसंगती दिसून येते. तर पोलीस ठाण्याच्या मुख्य इमारतीच्या मागे असलेली कर्मचारी निवासस्थान येथेदेखील अनेक बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे नेरळ पोलीस ठाणे यांच्याकडून आता आयएसओ मानांकन मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहे. असे मानांकन मिळविणारे नेरळ पोलीस ठाणे २०२४ मध्ये आयएसओ मानांकन मिळविणारे पोलीस ठाणे ठरू शकते.

दोन दिवस अवकाळी पाऊस

रोहे : प्रतिनिधी

रोहा शहरासह ग्रामीण भागात मंगळवारी अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. त्यानंतर बुधवारीदेखील पाऊस पडला.

रोहा शहरात बुधवारी सकाळपासुन ढगाळ वातावरण होते. रिमझीम चालु असताना दुपारी १२ घ्या सुमारास पाऊस पडला आहे. आलेल्या अवकाळी पावसामुळे वीटभट्टी व्यवसायिक धास्तावले आहेत. त्यामुळे त्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे ज्यांनी कामासाठी घर खोलुन ठेवले आहे. त्यांचे सामान भिजले आहे. या पावसाचा धसका आंबा बागायतदारानेसुध्दा घेतला आहे.

उरण नगरपरिषद, उरण
निविदा सूचना

जा.क्र. उनप/आरोग्य/२४८७/२०२४-२५
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड.
दिनांक : १०/०१/२०२४

उरण नगर परिषद खाली नमुद केलेल्या कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी कंत्राटदारांकडून मोहोर बंद निविदा/दरपत्रके मागवित आहे. निविदा/दरपत्र दिनांक : १९/१/२०२४ रोजी सायंकाळी ४:०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी उरण नगर परिषद उरण यांचे नावे दाखल करणेच्या आहेत.

अ. क्र.	तपशिल	इसारा रक्कम	निविदा फॉर्म फी
१	मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर ''संपुर्ण स्वच्छता (Deep Cleening) '' मोहिमे अंतर्गत उरण नगर परिषद हद्दीतील मुख्य रस्त्यावर साठलेली धुळ,माती तसेच मुख्य रस्त्यालगत व सार्वजनिक ठिकाणी खुरटी झाडे झुडपे गवत इत्यादी तसेच जुने डेब्रीज, लाकडे, फांद्या तसेच जुना साचलेला कचरा, मनुष्य बळ, जेसीबी, डंपरने उचलून तसेच प्रेशर जेटर मशीनच्या सहाय्याने रस्ते डिप क्लीन करणे बाबत विचार विनिमय करणे.	९५००/-	२०००/-

सदर कामाच्या अटी व शर्ती आरोग्य विभाग / स्वच्छता विभागातून माहिती करिता उपलब्ध असून इच्छुक ठेकेदारांनी आरोग्य विभाग प्रमुख यांचेशी संपर्क साधावा.

सही/-
(समीर जाधव)
मुख्याधिकारी
उरण नगरपरिषद उरण

मुरूडमध्ये अक्षता कलश यात्रा : भक्तांनी केला जय श्रीरामचा जयघोष

मुरूड : प्रतिनिधी

अयोध्या येथे उभारण्यात आलेल्या प्रभु श्रीरामचंद्राच्या मंदिरात प्रभु श्रीरामचंद्राच्या मूर्तीची २२ जानेवारी रोजी प्राणप्रतिष्ठा होत असुन त्यासाठी सोहळ्याच्या नियंत्रणासाठी श्रीरामजन्मभुमी ट्रस्टने गावोगाव अक्षता कलश पाठविले आहेत. अयोध्येतुन आलेल्या अक्षता कलशांची शोभायात्रा मोठ्या उत्साहात मुरुड-सबनीस आळी ते लक्ष्मीनारायण मंदिरा पर्यंत सकाळच्या दरम्यान टाळमृदंगाच्या गजरात रामनाम हरिनामाचा जयघोष मिरवणूक काढण्यात आली.

अक्षता कलश हातगाडीवर ठेऊन प्रभु श्रीरामाची भव्य अशी मोठी प्रतिमा ठेवण्यात आली होती.या अक्षता कलशांची पुजन माजी नगरसेवक अविनाश दांडेकर यांच्या हस्ते झाली. यानंतर शोभायात्रेला सुरुवात झाल्यानंतर जागोजागी पुरुष व महिला श्रीराम भक्तांनी जागोजागी दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती.

या वेळी उदय दांडेकर, भाऊ भगत, मिलिंद भगत, सुधीर भगत, आदेश दांडेकर आदिंसह श्रीराम भक्त उपस्थित होते.

अंजुमन महाविद्यालयात ऊर्जा संवर्धनावर प्रशिक्षण

मुरूड : प्रतिनिधी

मुरूडच्या अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ व पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात हरित ऊर्जा स्त्रोत आणि ऊर्जा संवर्धन या विषयावर युवा वर्गासाठी संस्थात्मक प्रशिक्षण कार्यक्रम झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान

विद्यापीठाचे डॉ. एन. एस. लिंगायत यांनी ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व सांगून दैनंदिन जीवनामध्ये ऊर्जेचा कमी वापर, अक्षय ऊर्जा स्त्रोतांचा वापर आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करून ऊर्जेचे संवर्धन कसे करू शकतो याविषयी मार्गदर्शन केले. प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमाचे संयोजन प्रा. अल्ताफ फकीर यांनी केले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL, ULWE

Proposed CBSE School
Plot No.01, Sector-12, Ulwe, Tal-Panvel, Dist-Raigad

STAFF RECRUITMENT

Applications are invited for the following posts for the Academic Year 2024-25 for immediate appointment.

Posts	Qualifications
	(A) Teaching Staff
Pre-Primary Teacher (02)	HSC/Graduate/Post graduate with ECCED/PTC/ Montessori Course with minimum 02 years of experience in CBSE school
PRT (04) **Hindi - 01** **Mathematics-01** **Science - 01** **Social Science-01**	Senior Secondary (or its equivalent) with at least 50% marks and 02-year Diploma in Elementary Education. OR Senior Secondary (or its equivalent) with at least 50% marks and 04-year Bachelor of Elementary Education (B.Ed.). OR Graduate/post graduate with at least 50% marks, Bachelor of Education (B.Ed.) with teaching experience in CBSE school at primary & secondary OR Preferred CTET qualified teachers. Must have knowledge of working on Computer.
Sports Teacher (01)	B.P.Ed/ M.P.Ed. (from Recognized university)
Music Teacher (01)	Bachelor Degree in Music/ Sangeet Visharad or equivalent from a recognized University
Librarian (01)	B.Lib/ M.Lib

Only those candidates who have their schooling from an English Medium School should apply.

Note: Interested candidates can send their resume with passport size photograph and self- attested copies of documents to Chairman JBSP Sanstha at, Plot no. 08, Sector 14, CIDCO colony, New Panvel-410206 on or before 31/01/2024.
Candidates may also submit the application by mail to **jbspsanstha1992@gmail.com** on or before the last date

For Additional Information Contact:
1) **Mrs. Saylee Patankar – 9930718675**
2) **Mr. Balkrushna Patil – 8108585055**

Hon. Shri Ramsheth Thakur (Ex-MP)
Chairman, JBSP Sanstha Panvel

वैचारिक कवडसे पुस्तकाचे प्रकाशन

माणगाव : प्रतिनिधी

सोलापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय दुसरे फातिमाबी शेख मुस्लीम मराठीसाहित्य संमेलनात माणगाव येथील कवियत्री तथा लेखिका सायराबानू वजीर चौगुले यांच्या वैचारिक कवडसे या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी अकोला येथील सुप्रसिद्ध साहित्यिक तथा लेखिका प्रा. डॉ. अर्जिनबी युसूफ शेख या उपस्थित होत्या. प्रकाशन सोहळा स्वागताध्यक्षा सुरय्या जहागीरदार, डॉ. अजीज नदाफ, प्रा. तांबोळी, प्रा. शकील शेख, अनिसा शेख, अय्युब नल्लामंदू, ॲड. हाशम पटेल, खाजाभाई बागवान आदींच्या हस्ते व उपस्थितीत उत्साहात झाला.

यापूर्वी चांदण शब्दाचं हा कविता संग्रह प्रकाशित झाला आहे. वैचारिक कवडसे हे दुसरे पुस्तकदेखील वाचनीय आहे.

खालापूरात ईव्हीएम मशीनबाबत जनजागृती

खोपोली : प्रतिनिधी

ईव्हीएम मशीनमध्ये कुठल्याही हस्तक्षेपाशिवाय कार्यरत असल्याबाबत जनजागृतीसाठी भारतीय निवडणूक आयोगाने प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी

खालापूर तहसील कार्यालयातील स्टाफ व कर्मचारी खोपोली शहराच्या वेगवेगळ्या भागात या मोबाईल व्हॅन द्वारे ईव्हीएम मशीनची जनजागृती करण्यात येत आहे.

नागरिकांना प्रत्यक्षात ईव्हीएममशीन हाताळण्यासाठी आग्रह करण्यात येत आहे त्यानंतर संबंधित नागरिकाची अभिप्राय घेण्यात येत आहे. यामुळे ईव्हीएम मशीनबाबत अप्रचार केला जातो तो अप्रचार या जनजागृती नंतर होणार नाही, असा विश्वास उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाचा भुखंड अ) १) कै. हिराजी कृष्णा घरत (मयत) व कै.मंगूबाई हिराजी घरत (मयत) यांचे वारस १/१) भरत हिराजी घरत १/२) हरेष हिराजी घरत २) कै. जनार्दन संभा घरत (मयत) यांचे वारस २/१) श्रीमती अनुबाई जनार्दन घरत २/२) श्री. दामोदर जनार्दन घरत २/३) श्री. जगदिश जनार्दन घरत २/४) श्री. तुषार जनार्दन घरत २/५) सुशिला किसन ठाकुर २ / ६) आशा रामदास म्हात्रे

ब) १) श्री. तुकाराम रामा घरत (मयत) यांचे वारस १/१) श्रीमती कुसुम तुकाराम घरत १/२) श्री. चंद्रहास तुकाराम घरत १/३) श्री. हिराजी तुकाराम घरत १/४) श्री. संतोश तुकाराम घरत १/५) श्री. मारूती तुकाराम घरत १/६) श्रीमती अहिल्या लक्ष्मण ठाकुर १/७) श्री. विश्वास तुकाराम घरत १/८) श्री. नरेश तुकाराम घरत १/९) श्रीमती वंदना संजय ठाकुर

क) १) कै. नारायण दत्तु म्हात्रे (मयत) यांचे वारस व कै. बयोबाई नारायण म्हात्रे (मयत) यांचे वारस १/१) रमाकांत नारायण म्हात्रे १/२) कै. विनायक नारायण म्हात्रे (मयत) यांचे वारस अ) श्रीमती प्रभावती विनायक म्हात्रे ब) श्री. निलेश विनायक म्हात्रे १/३) श्रीमती. देवता ज्ञानेश्वर पाटील १/४) श्री योगिता यदुनाथ घरत १/५) श्रीमती नलिनी रामा पाटील १/६) श्रीमती. हर्षलता दयानंद ठाकुर १/७) श्रीमती. निर्मला नंदकुमार कडू

ड) १) कै. नारायण पांग्या म्हात्रे (मयत) यांचे वारस १ / १) श्री. कमळाकर नारायण म्हात्रे १/२) श्रीमती मंजुळा रमेश मोकल १/३) श्रीमती. अंजनी परशुराम ठाकुर १/४) श्रीमती. मनिषा मदन पवार

इ) कै.शंकर शामल कडु (मयत) यांचे वारस व कै. सावित्री शंकर कडु (मयत) यांचे वारस १) श्री.अशोक शंकर कडु २) श्री. प्रकाश शंकर कडु ३) श्रीमती. मथुरा धावजी पाटील ४) श्रीमती. रंजना मदन पाटील ५) श्रीमती. रेखा विश्वानाथ म्हात्रे

ई) १) परशुराम रामदास तांडेल (मयत) १/१) हसुराम पुरषोत्तम तांडेल १/२) भिमाबाई पुरषोत्तम तांडेल १/३) विजय पुरषोत्तम तांडेल १/४) वंदना जनार्दन नाईक १/५) प्रदिप पुरूषोत्तम तांडेल १/६) चंद्रलाल पुरषोत्तम तांडेल
१) वामन हाल्या ठाकुर (मयत) १/१) लक्ष्मण वामन ठाकुर १/२) कमळाकर वामन ठाकुर १/३)नारायण वामण ठाकुर (मयत) यांचे वारस ३/१) विदयाधर नारायण ठाकुर ३/२) सूरज नारायण ठाकुर ३/३) कल्पना नारायण ठाकुर ३/४) प्राजक्ता जगदीश पाटील १/४) निळकंठ वामण ठाकुर (मयत) यांचे वारस ४ / १) राहुल निळकंठ ठाकुर ४/२) चंपाबाई नीलकंठ ठाकुर ४/३) सुमती धनेश थळी ४/४) अर्चना जातेश तांडेल ४/५) छाया समाधान मढवी यांचेकडून विकसन तथा भाडेपट्टा मालकी हक्क हस्तातरण आणि अनूशगीक कराराने कायम स्वरूपी आमचे अशिलांचे लाभात हस्तांतरीत करूण घेण्याचे योजले आहे.

भुखंडाचे वर्णन

भूखंड क्रमांक	सेक्टर क्रमांक	क्षेत्र चौ.मी.	नोड
२	५	२४८१	जे.एन.पी.टी.

वर नमूद भूखंडास अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न-वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहित प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात, सदर २१ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद भूखंड विकसन तथा भाडेपट्टा मालकी हक्क हस्तातरण आणि अनूशगीक त्रिपक्षीय कराराने आमचे आशीलांचे लाभात कायदेशीरपने हस्तांतरीत करून घेतील / पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

दिनांक १०/०१/२०२४
ठिकाण : नवी मुंबई

सही/-
ॲड. शरद जाधव

संपर्कासाठी पत्ता : तळमजला, रॉयल प्राईड बिल्डींग, भुखंड क्र. ११३, मिडल क्लास को.ऑप.हौ. सोसायटी, पनवेल - ४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड. मो.नं. ९८२०६३७१७५

निवडक

पत्रकार राकेश खराडे सन्मानित

मोहोपाडा : समृद्ध स्वयंप्रकाशित राष्ट्रनिर्माणाचे साहित्य विचार क्रांती अभियान व उन्नत महाराष्ट्र गोवा अभियानाच्या सन्मानार्थ. राष्ट्रीय कला, साहित्य, सामाजिक लोकरंग संमेलन पणजी गोवा २०२४ कौतुक सन्मान सोहळा भावप्रिय नृत्यालय कल्वर संस्था, गोवा अंतरुज कला अकादमी गोवा समृद्धी प्रकाशन, सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. या वेळी रायगड जिल्ह्यातील रसायनी येथील पत्रकार राकेश काशिनाथ खराडे यांना इंडियन टॅलेंट अवार्ड प्राध्यापक अनिलजी सामंत, संगीत गझलकार, अजय नाईक, गोवा कल्चरलच्या अध्यक्षा अंकिता यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. गोवा पणजी येथे महाराष्ट्रातील रसायनी मोहोपाडा येथे राहणारे राकेश खराडे यांना सन्मानित करण्यात आल्याने त्याचे अभिनंदनाचा होत आहे.

उलवे नगरीमध्ये बौद्ध धम्म परिषद

नवी मुंबई : उलवे येथे भव्यदिव्य बौद्ध धम्म परिषद संविधान चौक, सेक्टर २० उलवे येथे हजारोंच्या बौद्ध बांधवांच्या उपस्थितीत झाली. या परिषदेला दि बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव य. आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. या वेळी त्यांनी आंबेडकर यांनी उपस्थितांना संबोधित केले. त्याचबरोबर बौद्ध धम्म परिषदेचे अध्यक्ष व उद्घाटक म्हणून डॉ. एस. आर, इंदवंस महाथेरो यांची विशेष उपस्थिती होती. अध्यक्ष वामन वाघमारे, सचिन गवळे अरुण झनकार, प्रा. भोसले, सचिव वनिता कांबळे, बौद्ध धम्म परिषद उलवे, उपासक अरुण झंकार आदी कार्यकर्त्यांनी बौद्धधम्म परिषद यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहाय्य केले.

प्रा. भास्कर हनवटे यांना पुरस्कार

नवी मुंबई : रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय वाशी येथील क्रीडा विभागात क्रीडा संचालक म्हणून कार्यरत असणारे प्रा. भास्कर हनवटे यांना ४ जानेवारी रोजी अंबरनाथ या ठिकाणी झालेल्या महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटने कडून आदर्श गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रा. भास्कर हनवटे हे गेल्या दहा वर्षांपासून महाविद्यालयात कार्यरत आहेत. त्यांच्या या शैक्षणिक कारकीर्दीत अनेक राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडलेले आहेत. आंतरराष्ट्रीय जलतरणपटू अंशुमन झिंगरान, शिवछत्रपती पुरस्कार विजेती ऋतुजा उद्देशी या खेळाडूंना घडवण्यात प्रा. हनवटे यांचा मोलाचा वाटा आहे.

फसवणुकीच्या घटना पुन्हा वाढल्या

गोल्ड कॉईनचे अमिश दाखवून महिलेला सव्वा कोटीचा गंडा

पनवेल : वार्ताहर

गोल्ड कॉईनमध्ये जास्तीत जास्त गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे अमिश दाखवून एका जोडप्याने २५ व्यक्तींकडून तब्बल १ कोटी १३ लाखांचा अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सोनाली गणेश चव्हाण ऊर्फ सोनाली भंडारे (वय २९) व आशिष लवाटे (वय ४२) यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे.

खारघर सेक्टर-१२ मधील अनमोल को-ऑपरेटिव्ह सोसायटीत पती व मुलासह राहत होती. जून २०२० मध्ये या दोघांनी स्वामी कृपा बिझनेस सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड नावाची कंपनी सुरू केली होती. या कंपनीच्या एसआयपी प्लॅनमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला नफा होईल, अशी प्रलोभने दाखवण्यास सुरुवात केली होती. या दोघांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून खारघरमध्ये राहणाऱ्या दीपाली पाटील यांनी डिसेंबर २०२० मध्ये आठ लाख रुपये गुंतवणुकीसाठी दिले होते.

फेब्रुवारी २०२२ मध्ये मूळ मुद्दल तसेच परतावा अशी १० लाख ७ हजार ८२९ ची रक्कम सोनालीकडून मिळणार होती; मात्र फेब्रुवारी २०२२ मध्ये सोनाली चव्हाणने नवीन गोल्ड क्वॉईन स्कीमबाबत माहिती देऊन पैसे गुंतवण्यास सांगितले होते. त्या वेळी दीपाली पाटील यांच्यासह अनेक गुंतवणूकदारांनी गोल्ड स्कीममध्ये गुंतवणूक केली; मात्र सोने महाग झाल्याने स्कीम सहा महिन्यांनंतर बंद होणार असल्याचे सागंत गुंतवणूकदारांची फसवणूक केली.

> **गोल्ड कॉईनमध्ये गुंतवणुकीचे प्रलोभन दाखवून एक कोटी १३ लाख रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी दोघांविरोधात फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असून अद्याप कुणालाही अटक केलेली नाही.**
>
> **-राजीव शेजवळ, वरिष्ठ निरीक्षक, खारघर पोलीस ठाणे**

गुगल मॅपवर रिव्ह्यूसाठी पैशाचे आमिष; साडेतीन लाख उकळले

पनवेल : रामप्रहर वृत्त

गुगल मॅपवर राईट रिव्ह्यू ऑन गुगल मॅप द्या आणि प्रति रिव्ह्यू १५० रुपये कमवा असा संदेश सध्या अनेकांना येत आहे. कामोठे येथे राहणाऱ्या एका युवकाने भरपूर पैसे मिळतील या अपेक्षेने काम सुरू केले मात्र पैसे मिळवण्या ऐवजी त्या युवकाची तीन लाख ६५ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी गुन्हा नोंद झाला असून सायबर विभाग पुढील तपास करीत आहे.

कामोठे येथे राहणारे विश्वजि कोळेकर यांच्या मोबाईलवर ६ डिसेंबरला राईट रिव्ह्यू ऑन गुगल मॅप असा संदेश आला त्यात प्रतिरिव्ह्यू १५० रुपये मिळतील असे नमूद करण्यात आले होते. तसेच एक गुगल लिंक देण्यात आली होती. ती लिंक उघड करून त्यात रिव्ह्यू लिहून स्क्रीन शॉट पाठवा असे सांगण्यात आले. तसेच स्क्रीन शॉट पाठवल्यावर कंपनीच्या स्वागतिका यांच्याशी टेलिग्राम वर संपर्क करण्यास सांगितले त्याची लिंकही देण्यात आली, त्याप्रमाणे विश्वजित यांनी रिव्ह्यू देत त्याचा स्क्रीन शॉट पाठवला व कंपनी स्वागतिकाशी संपर्क केला. काही वेळाने १५० रुपये ऑनलाईन विश्वजित याला मिळाले.

ज्या खात्यातून हे पैसे आले त्यांचे नाव परी मिश्रा असे होते त्यांनी विश्वजित यांना अन्य एका समूहात भरती तसेच ठराविक रिव्ह्यू करण्याचे (टास्क) सांगण्यात आले. असे अनेक रिव्ह्यू दिल्यावर पैसे न आल्याने विश्वजित यांनी संपर्क केला असता प्रीपेड खाते उघडा त्वरित पैसे मिळत राहतील असे सांगण्यात आले.

विविध कारणे देत मागणी केल्या प्रमाणे १० हजार ते ५० हजार असे नऊ वेळा पैसे एकूण तीन लाख ६५ हजार रुपये पाठवण्यात आले, मात्र तरीही रिव्ह्यूचे पैसे देण्यात आले नाही तसेच भरलेले तरी पैसे द्या, अशी मागणी केली असता संपर्क करणे बंद केले गेले.

शेवटी आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर विश्वजित यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून अनोळखी व्यक्ती विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे, पोलिसांनीही तात्काळ कारवाई करीत ज्या खात्यातून पैसे भरले होते ते खाते गोठवले असून त्यात एक लाख रुपये आहेत.

विकसित भारत संकल्प यात्रा उपक्रमाला नवी मुंबईत नागरिकांचा उदंड प्रतिसाद

नवी मुंबई : बातमीदार

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या 'विकसित भारत संकल्प यात्रा' उपक्रमाला नवी मुंबई महापालिका क्षेत्रात ठिकठिकाणी नागरिकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.

दिघ्यापासून २७ डिसेंबर रोजी सुरू झालेली ही यात्रा १८ जानेवारीपर्यंत ४५ ठिकाणी केंद्र सरकार, राज्य शासन व नवी मुंबई महापालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या लोककल्याणकारी योजनांचा प्रचार व प्रसार करीत आहे. नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनानुसार यात्रेचे अत्यंत सुयोग्य नियोजन करण्यात आलेले आहे.

या उपक्रमामध्ये केंद्र व राज्य शासन तसेच नवी मुंबई महापालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती देणारे व योजनांचा लाभ मिळण्यासाठी अर्ज भरण्यापासून संपूर्ण सहकार्य करणारे विविध स्टॉल्स प्रदर्शित करण्यात आले आहेत. यामध्ये पीएम स्वनिधी योजना, स्वनिधी से समृद्धी योजना, आभा कार्ड, आयुष्यमान कार्ड योजना, पीएम उज्ज्वला योजना, पीएम विश्वकर्मा योजना, पीएम मुद्रा लोन, स्वच्छ भारत अभियान, स्टार्ट अप इंडिया, स्टँड अप इंडिया, खेलो इंडिया, पीएमई बस सेवा, आरोग्य तपासणी अशा विविध योजनांच्या स्टॉलचा समावेश आहे.

मेडिकवर हॉस्पिटल्सच्या विशेष आरोग्य कार्डचे अनावरण

पनवेल : वार्ताहर

खारघरमधील मेडिकवर हॉस्पिटल्सच्या विशेष आरोग्य कार्डचे अनावरण पनवेल मनपा आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांच्या हस्ते झाले.

चाळीशीनंतर प्रत्येकाने वर्षातून एकदा तरी आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे. उपचारापेक्षा प्रतिबंध गरजेचे आहे असेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले. या चाचण्यांमध्ये रक्तातील साखरेची पातळी, संपूर्ण रक्त तपासणी, मूत्र विश्लेषण, लिपिड प्रोफाइल, यकृत कार्य चाचणी, थायरॉईड उत्तेजक संप्रेरक, मॅमोग्राफी, पॅप स्मियर, छातीचा एक्स-रे, पल्मोनरी फंक्शन चाचणी यासारख्या १७ प्रमुख चाचण्या, ईसीजी आणि तज्ज्ञाच्या सल्ल्याचा यामध्ये समावेश आहे. आधुनिक जीवनातील दबावामुळे तणावाची पातळी वाढू शकते, याव्यतिरिक्त प्रदूषण आणि विषारी पदार्थांमुळे किडनी, यकृत, फुफ्फुस आणि थायरॉईड विकारांचे प्रमाण वाढते आहे. वेळीच निदान व उपचाराने एखाद्याला गंभीर आजारांवर मात करता येणे शक्य होते अशी प्रतिक्रिया डॉ. नवीन के. एन (महाव्यवस्थापक आणि केंद्र प्रमुख, मेडिकवर हॉस्पिटल्स, नवी मुंबई) यांनी स्पष्ट केले.

नमो खारघर मॅरेथॉनची तयारी वेगाने सुरू

खारघर मॅरेथॉन १४ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ठीक पाच वाजल्यापासून खारघर दौडने सुरू होणार आहे. या दौडचे रूट मार्किंग करण्यात आले.

युवा संगीत संमेलन

पनवेल : रामप्रहर वृत्त

युवा पिढीमध्ये हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताची आवड निर्माण व्हावी व हा समृद्ध वारसा त्यांनी जतन व संवर्धन करावा, या हेतूने गेली २७ वर्षे पनवेल कल्चरल सेंटर या संस्थेतर्फे राज्यस्तरीय हिंदुस्तानी शास्त्रीय ख्याल गायन स्पर्धा आयोजित केली जात आहे. या स्पर्धेची पहिली फेरी नुकतीच झाली असून २१ जानेवारी २०२४ रोजी पनवेलमध्ये होणाऱ्या अंतिम फेरीसाठी पुढील स्पर्धकांची निवड करण्यात आली आहे.

युगंधरा केचे (संभाजीनगर), चिन्मय लेले (मुंबई), अन्वेषा हलधर (नवी मुंबई), स्वप्नील राठोड (नांदेड), दत्तराज चारी (गोवा), हिमांशू तांबे (पुणे), श्वेता ठाकूर, (उलवे), शरण्या पिसुर्लेकर (गोवा), स्नेहल पाटील (अलिबाग), वैष्णवी बारकटे (लातूर), अभयसिंग वाघचौरे (पुणे), सागर देशमुख (पुणे).

यावर्षी या स्पर्धेस ४९ स्पर्धकांचा विक्रमी प्रतिसाद लाभला असून स्पर्धे ची ही अंतिम फेरी म्हणजे नवोदित, युवा कलाकारांचे एक संगीत संमेलनच असेल. सकाळी १० ते १ आणि दुपारी २.३० ते ६ या दरम्यान पनवेल कल्चरल सेंटरमध्ये होणाऱ्या अंतिम फेरीसाठी सर्व संगीतप्रेमींनी उपस्थित राहून स्पर्धकांना प्रोत्साहित करावे, असे संस्थेतर्फे आवाहन करण्यात येत आहे.

अधिक माहितीसाठी स्पर्धा समिती प्रमुख मिलिंद गोखले (८८७९९ ८७३७१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

शिक्षण हक्क कायद्याबाबत पालकांमध्ये जागृतीची गरज - प्रा. सुरेखा खरे

शिक्षण हक्क कायदा प्रशिक्षण कार्यशाळा

कळंबोली : बातमीदार

शिक्षण हक्क कायद्याबाबत पालकांमध्ये जनजागृती नसल्यामुळे अनेक शैक्षणिक संस्था विद्यार्थ्यांना आरटीई अंतर्गत २५ टक्के आरक्षित प्रवेश देताना चुकीची प्रक्रिया राबवून आरटीई अंतर्गत प्रवेश नाकारतात म्हणूनच पालकांमध्ये आरटीई बाबत जनजागृती होणे गरजेचे आहे, असे मत अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क परिषदेच्या नेत्या सुरेखा खरे यांनी केले. रविवारी युसूफ मेहेरअली सेंटरचे मधू-प्रमिला दंडवते संकुल बांधनवाडी येथे व्यक्त केले.

पनवेल येथे अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभेच्या रायगड जिल्हा शाखेच्या वतीने शिक्षण हक्क कायदा प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना सुरेखा खरे बोलत होत्या. समाजवादी शिक्षण हक्क सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. रमेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ह्या कार्यशाळेत शिक्षण हक्क सभेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. शरद जावडेकर, ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, रायगड जिल्हा समिती अध्यक्ष ॲड. संदीप घाडगे, सचिव उदय गावंड, राजेश रसाळ यांच्यासह पुण्यावरून आलेले पालक प्रतिनिधी विलास अहिरकर आणि संदीप पाटील यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

दरम्यान, शिक्षण हक्क कायद्या अंतर्गत अनुदानीत व खाजगी विनाअनुदानित शाळांमध्ये २५ टक्के प्रवेश प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी सभेच्या वतीने २१ जानेवारीला दक्षिण रायगडसाठी माणगाव येथे द्वितीय कार्यशाळा घेण्यात येणार असल्याचे प्रा. रमेश पाटील यांनी यावेळेस सांगितले. कार्यशाळेसाठी उत्तर रायगडमधील पनवेल, पेण, खालापूर, मुरूड, उरण तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणारे विविध सामाजिक संस्था संघटनांचे प्रतिनिधी, स्वयंसेवी कार्यकर्ते उपस्थित होते. ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी राजेश रसाळ यांनी विशेष मेहनत घेतली.

कचरा वेचणाऱ्यांच्या मुलांनी दाखवला कलाविष्कार

नवी मुंबई : बातमीदार

कचरा वेचणाऱ्यांची मुले पुन्हा कचऱ्याच्या कामात पडू नयेत म्हणून त्यांचं सक्षमीकरण करण्यासाठी श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्ट विविध उपक्रम राबवत आहे. त्यानुसार वाशी विष्णुदास भावे येथे असा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. अभ्यास वर्गाच्यामुलांनी भारतीय संस्कृती, भारतीय एकात्मता व परंपरा, अभिजात नृत्य इत्यादीचा अविष्कार सादर केला.

सद्यस्थिती वरील समस्याचा आढावा घेणारी नाटिकाही सादर करण्यात आली. यासाठी शिक्षकांनी खूप परिश्रम घेतले. ट्रस्टचे अध्यक्ष श्री राधाकृष्णन व ललिता आपल्या प्रस्तावनेत म्हणाल्या की शिक्षणापासून वंचित असलेल्या मुलांपर्यंत शिक्षण पोहचवण्याचे काम या संस्थेकडून अविरत चालू राहील. स्त्री मुक्ती संघटनेच्या वृषाली मगदूम यांनी श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्ट व स्त्रीमुक्ती संघटने चा समन्वय कायमस्वरूपी राहावा व झोपडपट्टीतील मुले शिक्षणाच्या प्रवाहात येऊन त्यांचे भविष्य सुकर व्हावे, असा आशावाद प्रकट केला.

या वेळी ब्रिगेडियर धरमप्रकाश, अनिल कर्ता, के आर गणेश, एस राघवन, राजेश ग्रोवर आदी विश्वस्त मंडळी उपस्थित होती.

तब्बल ४२५ मुलांचा सहभाग

ठाणे, कळवा, दिघा, रबाळे, बेलापूर बोनसरी, खांदेश्वर, पनवेल इत्यादी वस्त्यांवरील ४२५ मुले, त्यांचे पालक उपस्थित होते. संगीता साबळे व अजित खताळ यांनी कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन केले. जयश्री वर्पे, कविता, अमोल, प्रियांका, सिमरन, राहुल पवार, सुप्रिया, सारिका आदी शिक्षकांनी कार्यक्रम उत्कृष्ट होण्यासाठी मेहनत घेतली.

वाचन संस्कृती जोपासण्यासाठी अक्षर मानव संस्थेचा पुढाकार

मोहोपाडा : प्रतिनिधी

अक्षर मानव ग्रंथालय विभागकडून महाराष्ट्रभर वाचनालय सुरू होत असून सध्या सात्रळ (अहमदनगर), रसायनी (रायगड), राळेगणसिद्धी (अहमदनगर), बावी (अहमदनगर), दौंड (पुणे), रावणगाव (पुणे), धायरी (पुणे), औरंगाबाद, आंबेड बुद्रूक (संगमेश्वर, रत्नागिरी) या ठिकाणी ही वाचनालय सुरू आहेत.

राज्यात इतर ठिकाणांवरही ग्रंथालय सुरू करण्यासाठी संस्थेने पुढाकार घेतला आहे. वाचन संस्कृती रूजवण्याचा प्रयत्न अक्षर मानव संस्थेच्यावतीने होत असल्याचे दिसून येते. याअगोदर जवळपास पाच सहा लाखांची पुस्तके देणगी म्हणून गोळा केलीत. आता काही ठिकाणी सुसज्ज संदर्भ ग्रंथालय सुरू करण्याचा मानस आहे. या संदर्भ ग्रंथालयामुळे मुलांना पदव्युत्तर शिक्षणासाठी उपयुक्त ठरणार असून त्यांना मुंबई पुणे येथे जावे लागणार नाही. त्यांचा वेळ वाचेल, हाच वेळ ते अभ्यासासाठी वापरला जाईल.

तुमच्याकडे जूनी, वाचून झालेली कुठल्याही भाषेतील पुस्तके असतील ती अक्षर मानवला देणगी म्हणून देण्यात यावी, असे आवाहन रसायनीतील ज्येष्ठ साहित्यिक रोहिदास कवळे अक्षर मानव ग्रंथालय विभाग प्रमुख (९३७००३५६७६) यांनी केले आहे.

निवडक

अभिनव ज्ञानमंदिरची बाजी

माणगाव : तळा तालुका विज्ञान प्रदर्शन गो. म. वेदक विद्यालय येथे नुकतेच झाले. या वेळी ऑनलाईन प्रतिकृती, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, निबंध स्पर्धा झाल्या. स्पर्धेमध्ये उसर खुर्द येथील अभिनव ज्ञानमंदिर शाळा अव्वल ठरली आहे. प्रशालेने एकूण पाच बक्षिसे मिळवली. यामध्ये रिया शिंदे विज्ञान प्रतिकृती द्वितीय क्रमांक, प्रश्नमंजुषा द्वितीय; माध्यमिक व उच्च माध्यमिक गटात रुची गुजर प्रश्नमंजुषा प्रथम क्रमांक, संतोष घाग प्रयोगशाळा परिचर शैक्षणिक निर्मिती प्रथम क्रमांक, राजेंद्र भगत माध्यमिक शिक्षक शैक्षणिक साहित्य निर्मिती प्रथम क्रमांक प्राप्त केला. बक्षीस वितरणाला तळा विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव देशमुख, गटशिक्षणाधिकारी तांबट, विस्ताराधिकारी ठाकूर तसेच प्रतिकृतींचे परीक्षण बिराडी बोरली ज्युनिअर कॉलेज श्रीवर्धनचे विद्याधर जोशी यांनी केले.

तलावात बुडून वृद्ध महिलेचा मृत्यू

माणगाव : इंदापूर येथील सरकारी दवाखान्याजवळील तलावात बुडून एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (दि. ९) दुपारी १२:३० वा. च्या सुमारास घडली. या घटनेची माहिती राम मालू वाघमारे (वय ४२, रा. गौळवाडी आदिवासीवाडी, इंदापूर) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. जना मालू वाघमारे (वय ६०) या रानात फाटी आणण्याकरिता गेल्या असता तलावाच्या पाण्यात पडल्या. त्यांना उपचाराकरिता उपजिल्हा रुग्णालयात आणले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

बंदुकीतून गोळी सुटून शिकाऱ्याचा मृत्यू

खोपोली : जंगलात शिकारीसाठी गेलेल्या जयराम लक्ष्मण हिंदोळा (वय २९, रा. जांबरुंग ठाकुरवाडी) या शिकाऱ्याचा बंदुकीतून गोळी सुटल्याने मृत्यू झाल्याची घटना खालापुरात घडली आहे. जयराम आणि त्याचा मित्र नागेश अंबु पारधी (वय ३४, रा. उंबरवीरा, जांबरुंग) मंगळवारी रात्री जांबरुंग ठाकुरवाडी मागील मंकीहिल येथील जंगलात शिकार करण्यासाठी गेले होते. जयरामचा चालताना तोल जाऊन तो खाली पडल्यामुळे त्याचेकडील लोड एकनळी ठासणीच्या बंदुकीतून गोळी सुटली. यात गंभीर जखमी झालेल्या जयरामला उपचाराकरीता खोपोली येथे रुग्णालयात नेले असता तो मृत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई एस. व्हारंबळे हे करीत आहेत.

अवकाळी पावसाने बळीराजा चिंतेत

आंबा बागायत, रब्बी पिके धोक्यात

नागोठणे : बातमीदार

रायगडात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे संपूर्ण रायगडातील आंबा बागायतदार व रब्बी पिके घेणारे शेतकरी चिंतकग्रस्त झाले आहेत.

कोकणातील हापूस आंब्यांच्या बागा सध्या मोहराने फुलल्या आहेत. आंबा बागायतदार शेतकरी कष्ट करून फळाची वाट पाहत असतानाच अचानक अवकाळी पाऊस आल्याने त्याचे

प्रचंड नुकसान झाले आहे. त्याचबरोबर खेड्यापाड्यातील गरीब शेतकरी पावसाळी भातशेती झाली की, रब्बी हंगामात वाल, घेवडा, तूर, मटकी, चवळी अशा पिकांची देखील लागवड करतो, मात्र हाताशी आलेल्या पिकांवर अवकाळी पावसाचा फटका बसून पिके नष्ट होण्याच्या भीतीने शेतकरी हवालदिल झाला आहे.

नैसर्गिक आपत्ती तसेच अवकाळी पावसासारख्या संकटातून काहीतरी भरपाई मिळावी यासाठी शेतकरीवर्ग मोठ्या संख्येने पिकविमा काढतो, मात्र तो मिळण्यास विलंब होत असल्याची खंतदेखील बळीराजाने मांडली.

'कोर्लई'च्या दरवाजावर कुटूंबासह ठार मारण्याचे धमकीपत्र

पुरातत्व विभागाच्या कर्मचाऱ्याची रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रार

रेवदंडा : प्रतिनिधी

मुरूड तालुक्यातील कोर्लई किल्ल्याच्या दरवाजावर कुटूंबासह जीवे ठार मारण्याचे धमकीपत्र अज्ञाताने 'शिवप्रेमी' नावाने चिकटवल्याने खळबळ उडाली आहे. याबाबत पुरातत्व विभगाचे कर्मचारी सुहास पवार यांनी रेवदंडा पोलिसांकडे तक्रार नोंदविली आहे.



रेवदंडानजीक मुरूड तालुक्यातील पोर्तुगिजकालीन कोर्लई किल्ला आहे. भक्कम बांधकामाचे व तसेच पश्चिमेला अरबी समुद्र व पुर्वेला कुंडलिकेची लांबलचक समुद्रखाडी डोळ्याचे पारणे फेडणारे निसर्गरम्य दृश्य यामुळे हा किल्ला पाहण्यासाठी पर्यटक व स्थानिकांची नित्याने गर्दी असते. कोर्लई किल्ला भारतीय पुरातत्व विभागाचे अखत्यारीत आहे. हा किल्ला सायकांळी ६ वा. बाहेरील व्यक्तीसाठी बंद केला जातो. २५ डिसेंबर रोजी कोर्लई किल्ल्याच्या पूर्वेकडील बंद दरवाजाच्या लाकडी फळ्या काढून अज्ञाताने नुकसान केले व हे गेट तुम्ही बंद केलेत, तर तुमचे खानदान नष्ट करू, असे धमकीपत्र शिवभक्त नावाने चिकटविण्यात आले आहे.

याबाबत कोर्लई किल्ल्यातील पुरातत्व विभागाचे एमटीस अधिकारी गोकुळ सुखदेव बिर्हाडे यांनी रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली असून अधिक तपास रेवदंडा पोलीस ठाण्याचे हवालदार पुळेकर हे करीत आहेत.

शिक्षक परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचे ना. रवींद्र चव्हाण यांना निवेदन

पोलादपूर : प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यातील शिक्षक परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी शनिवारी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांची भेट घेऊन शिक्षक तसेच शैक्षणिक समस्यांची माहिती देत त्यांना निवेदन दिले.

शिक्षक परिषद राज्याध्यक्ष वेणूनाथ कडू, कोकण विभाग कार्यवाह लक्ष्मण वालगुडे, उपाध्यक्ष विजय भामरे, जिल्हाध्यक्ष विजय दरेकर व सुखदेव मोरे यांनी मंत्री रवींद्र चव्हाण यांना विविध समस्यांची सोडवणूक करण्यासंदर्भात लेखी निवेदन दिले. या वेळी ना. चव्हाण यांनी नजिकच्या काळामध्ये रायगड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी या निवेदनातील मुद्दे आणि केलेल्या चर्चेप्रमाणे कार्यवाही करण्याची ग्वाही शिक्षक परिषदेच्या पदाधिकाऱ्यांना दिले.

अवकाळी पावसाने थंडी गायब

रायगड : जिल्ह्यात अनेक ठिकाणी गेल्या दोन दिवसांपासून अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने थंडी गायब झाल्याचे जाणवत आहे.

हवामान विभागाने वर्तविलेल्या अवकाळी पावसाच्या अंदाजानुसार रायगडात पावसाने हजेरी लावली. यामुळे आत्ता कुठे थंडीचा आस्वाद घेत असताना पुन्हा थंडी गायब झाल्याने नागरिकांचा हिरमोड झाला.

आगरदांडा ते खोकरी मुख्य रस्ता दुरूस्तीची मागणी

मुरूड : प्रतिनिधी

मुरूड आगरदांडा ते खोकरी मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्याचप्रमाणे पर्यटकांमधूनही नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे या रस्त्याची दुरूस्ती करण्याची मागणी करीत मुरूड जंजिरा कुणबी समाजोन्नती संघ ग्रामीण समन्वय समितीच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंतांना निवेदन दिले आहे.

या वेळी अध्यक्ष संतोष पाटील, सचिव सचिन पाटील, मनोहर वास्कर, राजेंद्र मिसाळ, धर्मा मिसाळ, आत्माराम कर्जेकर, मंगेश टकले, रामा आरकर, परशुराम आरकर आदींसह नांदले, चिंचघर, उसडी चाफेगाव, अमृतखार, सावली, मिठागर येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम विभागला गौरीगणपती सणाअगोदर आगरदांडा ते खोकरी मुख्य रस्ता दुरुस्तीकरिता निवेदन दिले होते. त्या वेळी आम्ही रस्त्याची दुरूस्ती करू, असे आश्वासन दिले होते, परंतु त्यानंतर कोणतीही कार्यवाही झाली नाही. हा रस्ता पूर्णपणे खराब होऊन जागोजागी खड्डे पडले आहेत. आजारी रुग्ण असो व गरोदर स्त्रियांना वैद्यकीय उपचार घेण्यासाठी या रस्त्यावरून येजा करताना जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या रस्त्याची लवकरात लवकर दुरूस्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा २६ जानेवारी रोजी रास्ता रोको करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

सुंदरराव मोरे महाविद्यालयात स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण

पोलादपूर : प्रतिनिधी

शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ, महाड संचलित पोलादपूर येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात रौप्य महोत्सवी वर्ष सांगता समारंभानिमित्त वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन शनिवारी (दि. १३) करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक रावेरकर यांनी दिली आहे.

रौप्य महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ आणि वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचे उद्घाटन विधानपरिषद सदस्य आमदार प्रवीण दरेकर यांच्या हस्ते, खासदार सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून या वेळी आमदार भरत गोगावले प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन उपप्राचार्य प्रा. सुनील बलखंडे यांनी केले आहे.

कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांना प्रशिक्षण

कर्जत : प्रतिनिधी

तालुक्यातील शाश्वत शेतीसाठी प्रयत्न करणारे युनायटेड वे स्वयंसेवी संस्थेकडून शास्वत शेतीसाठी मार्गदर्शन केले जाते. तालुक्यातील १७ गावांमध्ये समग्र ग्रामविकास कार्यक्रम राबविण्यात येत असून त्या माध्यमातून मशरूम शेती आणि त्याचे मार्केटिंग शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

युनायटेड वे मुंबई संस्थेद्वारे जलसंजीवनी प्रकल्प कर्जत तालुक्यातील आदिवासीबहुल भागातील खांडस, अंभेरपाडा, नांदगाव, कुरुंग ग्रामपंचायतीतील १७ गावात तसेच समग्र ग्रामविकास कार्यक्रम पाथरज आणि वारे ग्रामपंचायतीमधील एकूण ११ गावात युनायटेड वे मुंबई संस्था यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. प्रशिक्षणासाठी जीबीएस मशरूम आणि अड्ग्रो बिजनेस प्रायवेट लिमिटेड, चंद्रपूर या कंपनीचे तज्ज्ञ प्रफुल्ल शेंडे यांनी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

मशरूमचे आहारातील महत्त्व, मशरूमबद्दलचे प्रचलित गैरसमज, मशरूमपासून बनविण्यात येणारे विविध पदार्थ (बिस्कीट, सूप, लोणचे इ.), मशरूमचे उत्पादन, मार्केटिंग यांसारखे काहीसे अवघड वाटणारे विषय त्यांनी अलगद सोप्या पद्धतीने, हसत खेळत प्रशिक्षणार्थींपर्यंत पोहचवले. प्रशिक्षणात एकूण ४२ जणांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

एन. बी. मोरे महाविद्यालयाच्या एनएनएस शिबिराचे उद्घाटन

रोहा : प्रतिनिधी

तालुक्यातील एम. बी. मोरे महाविद्यालय धाटाव येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएनएस) विभागाचे निवासी शिबिराचे उद्घाटन सोमवारी (दि. ८) करण्यात आले. हे सात दिवसीय श्रमसंस्कार निवासी शिबिर १४ जानेवारीपर्यंत ग्रुप ग्रामपंचायत रोठ (बु.) येथे आयोजित केले आहे.

या वेळी संस्थेचे संचालक उत्तमराव मोरे, ग्रामपंचायत रोठ (बु.) सरपंच नितिन वारंगे, सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, एनएनएसचे रायगड जिल्हा समन्वयक प्रा. तुळशीदास मोकल, प्रा. सुकुमार पाटील, प्राचार्य प्रसन्न म्हसळकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एनएनएस कार्यक्रम अधिकारी प्रा. मयूर पाखर यांनी केले. महाविद्यालयाच्या ग्रंथपाल निर्मला थोरात, प्रा. सुरभी ठाकूर व कर्मचारी अर्चना रटाटे या सर्वांचे सहकार्य लाभले. शिबिरामध्ये ५० स्वयंसेविकांनी सहभाग घेतला आहे.

विद्यार्थ्यांना घडविणारे शिक्षक हे मूर्तिकारच असतात -अंजली अत्रे

कर्जत : प्रतिनिधी

आताचा विद्यार्थी हुशार आहे. विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे छंद जोपासण्याची आवड निर्माण करा. पालकांनीही त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले पाहिजे, तसेच पालकांनीही विद्यार्थ्यांना वेळ देऊन त्यांच्यातील कलागुण जोपासणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना घडविणारा शिक्षक मूर्तिकारच असतो, असे प्रतिपादन बालसाहित्यिका व अभिनेत्री अंजली अत्रे यांनी केले.

कर्जत तालुका विद्याप्रसारक मंडळाचे स्वातंत्र्य सैनिक दत्तात्रेय पांडुरंग डोंबे विद्यानिकेतन विद्यालयाच्या वतीने 'निनाद' स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या स्नेहसंमेलनाच्या समारोपप्रसंगी अभिनेत्री अंजली अत्रे बोलत होत्या.

या वेळी समारंभाचे अध्यक्ष डॉ. नितीन आरेकर, शालेय समिती अध्यक्ष माधव भडसावळे, सदस्य रोहिणी जोशी, स्नेहसंमेलन प्रमुख शिल्पा गायकवाड, विद्यार्थी प्रतिनिधी ओमकार भोईर आदी उपस्थित होते. माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मीरा कडू यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका माया म्हसे यांनी अहवाल सादर केला.

प्राथमिक विभागाच्या शिक्षिका स्नेहल मोरे यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार देण्यात आला. अध्यक्षीय भाषणात डॉ. आरेकर यांनी, पालकांची ओळख आपल्या पाल्यामुळे व्हावी, असे सूचित केले.

रायगड रासेयो संघाचा आपत्ती व्यवस्थापन शिबिरात सहभाग

रोहे : प्रतिनिधी

महामहिम राज्यपालांच्या संकल्पनेला अनुसरून २०११-१२पासून राज्यात आव्हान राज्यस्तरीय विशेष आपत्ती व्यवस्थापन शिबिराचे आयोजन केले जाते. यावर्षी गोडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठाने या राज्यस्तरीय आव्हान विशेष आपत्ती व्यवस्थापन शिबिर आयोजित केले होते.

या शिबिरात रायगड जिल्ह्यातील आकांक्षा भिंगारे, स्वप्नाली पवार, सोनाली कदम, श्वेता विश्वकर्मा, भाविका शहासने, जान्हवी हातमोडे, श्रिया साखीलकर, रंजना राव, लक्ष्मी राय, दिव्या शिंदे, हेमंत केवट, सागर सिंह, स्वरूप केंद्रे, नितेश कोळी, रोहितकुमार प्रजापत, सिद्धेश म्हात्रे, कुणाल भोईर, दामेश तांबट, साहिल सुतार, शार्दुल शिंदे हे वेगवेगळ्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व स्वयंसेविका सहभागी झाले होत. डॉ. अनिल झेंडे यांनी संघनायक म्हणून यशस्वी जबाबदारी पार पाडली.

या राज्यस्तरीय आव्हान आपत्ती व्यवस्थापन शिबिरात आपत्ती म्हणजे काय, आपत्तीच्या मूलभूत संकल्पना, आपत्तीचे प्रकार, एनडीआरएफचे व्यवस्थापन आणि भूमिका, एनडीआरएफ प्रशिक्षण, समुदायावर आधारित प्रथमोपचार पद्धती, आपत्तीत सापडलेल्या रुग्णांना उचलणे आणि हलवणे, सर्पदंश आणि प्राणीदंश झाल्यावर तातडीने कोणते उपाय करावे, चक्रीवादळ झाले तर बचावात्मक कार्य कसे करावे, आपत्ती आल्यानंतर जखमी रुग्णांवर उपचार कसे करावे, भार उचलण्याच्या पद्धती, आणि स्थिर करण्याचे मार्ग, भूकंप, पूर परिस्थितीत मदत कशी करावी याबाबतचे ज्ञान तसेच पूर, पाणी बचावतंत्र, दोरी वापरून पाणी बचावतंत्र, जलतरण कौशल्य आणि जीवन वाचवण्याचे कौशल्य, वेगवेगळ्या प्रकारच्या गाठी आणि त्याचा वापर ,सुधारित दोरी बचाव तंत्र, चढणे, ओलांडणे आणि उतरणे तंत्र याबाबतचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात आले.

न्यू इंग्लिश स्कूल वलंग स्कूलसाठी बायसिकल लायब्ररी

महाड : प्रतिनिधी

हायकल कंपनीने वलंगमधील न्यू इंग्लिश स्कूलसाठी सायकल लायब्ररी प्रोजेक्ट सुरू केला आहे. आदिवासी कुटुंबातील मुलांना प्रवास करताना भेडसावणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी या प्रकल्पांतर्गत शाळेला ५९ सायकल देण्यात आल्या.

न्यू इंग्लिश स्कूल या शाळेत इ. पाचवी ते दहावीच्या वर्गामध्ये १३६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यापैकी ८२ विद्यार्थी गरीब आदिवासी आणि शेतकरी कुटुंबातील आहेत. बहुतांश विद्यार्थी शाळेत येण्यासाठी दररोज तीन ते चार किमी चालतात. या विद्यार्थ्यांची प्रवासाची समस्या दूर करण्यासाठी शाश्वत, पर्यावरणानुरूप उपाय पुरवणे यासाठी बायसिकल लायब्ररी सुरू करण्यात आली आहे. या सायकल्सची देखरेख आणि त्या दीर्घकाळपर्यंत उपयोगात आणता याव्यात याच्या दुरूस्तीचे काम शाळेमार्फत केले जाणार आहे.

एचआर विभागाचे प्रेसिडेंट राजेश झा यांनी, सामाजिक कल्याणाप्रती आमची बांधिलकी विकासाच्या आड येत असलेल्या वास्तविक समस्या ओळखून त्या दूर करण्यापासून सुरू होते. धोरणात्मक सीएसआर उपक्रमांमार्फत आम्ही लोकांच्या जीवनावर शाश्वत प्रभाव निर्माण करण्यासाठी, शिक्षणाच्या आड येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आणि समुदायांना सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील आहोत, असे सांगितले.

आदिवासी बांधवांना विविध दाखले वाटप

रायगड : रामप्रहर वृत्त

जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण व तहसीलदार अलिबाग विक्रम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग तालुक्यातील आंबेपूर (चंदरवाडी व ज्ञानवाडी) येथे मंडळ अधिकारी कार्यालय पोयनाड चरीतर्फे शिबिर झाले.

या वेळी मंडळ अधिकारी महेश निकम, तलाठी हेमंत चांदोरकर, मनोज वाडकर तसेच प्रकल्प कार्यालय पेण प्रतिनिधी आश्रमशाळा प्रणित पाटील, सेतु व्यवस्थापक पेझारी व इतर मंडळातील तलाठी व कर्मचारी उपस्थित होते.

या शिबिरात आधार कार्ड, उत्पन्न दाखले, जातीचे दाखले, रेशनकार्ड व इतर शासकीय दाखले वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात ४६ आदिवासी बांधवांना लाभ देण्यात आला.

भारत-अफगाणिस्तानमध्ये आजपासून टी-२० द्विपक्षीय मालिका

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

२०२४च्या टी-२० विश्वचषकापूर्वी भारतीय संघ अफगाणिस्तानविरुद्ध तीन टी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहे. या मालिकेतील पहिला सामना गुरुवारी (दि. ११) मोहालीच्या मैदानावर होणार आहे. या मालिकेसाठी अफगाणिस्तानने आपला संघ जाहीर केला आहे. भारतीय संघाने देखील आपल्या संघाची घोषणा केली आहे. टी-२० विश्वचषकापूर्वी दोन्ही संघांसाठी ही मालिका खूप महत्त्वाची आहे.

या मैदानावर आतापर्यंत सहा टी-२० आंतरराष्ट्रीय सामने आयोजित केले गेले आहेत. या कालावधीत लक्ष्याचा पाठलाग करताना संघाने चार सामने जिंकले आहेत, तर दोन सामन्यांमध्ये प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघाने विजय मिळवला आहे. या मैदानावर सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम भारताच्या नावावर आहे. भारताने २००९मध्ये श्रीलंकेविरुद्ध २११ धावा केल्या होत्या. भारताने सप्टेंबर २०२२मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध २०८ धावा केल्या होत्या. या मैदानावर सर्वाधिक धावा करणारा फलंदाज विराट कोहली आहे. भारतीय संघाने या मैदानावर चार सामने खेळले आहेत, त्यापैकी तीन सामन्यांमध्ये टीम इंडियाला पराभवाचा सामना करावा लागला आहे.

टी-२० क्रिकेटमध्ये भारत आणि अफगाणिस्तानमध्ये आतापर्यंत पाच सामने खेळले गेले आहेत. त्यापैकी चार सामने भारताने जिंकले आहेत आणि एका सामन्याचा निकाल लागला नाही. अफगाणिस्तानच्या संघाने अद्याप भारताविरुद्ध एकही टी-२० सामना जिंकलेला नाही. टी-२० क्रिकेटमध्ये अफगाणिस्तानविरुद्ध भारताचा वरचष्मा राहिला आहे.

टी-२० विश्वचषक २०२४पूर्वी भारताची ही शेवटची टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका आहे. अशा स्थितीत भारतीय संघाला खेळाडूंची चाचपणी करून संघबांधणीसाठी करण्याची ही शेवटची संधी आहे. स्टार फलंदाज सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पंड्या दुखापतींमुळे या मालिकेत भाग घेणे कठीण दिसत आहे, तर अफगाणिस्तानकडे असे खेळाडू आहेत, जे टीम इंडियाचे विजेतेपदाचे स्वप्नभंग करू शकतात.

कराटे चॅम्पियन स्पर्धेत भक्ती भोईरला सुवर्ण

उरण : बातमीदार

शौर्य मार्शल आर्ट्स अँड स्पोर्ट्स अकॅडमी रायगड यांच्या वतीने दुसरी रायगड जिल्हास्तरीय कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा वडखळ येथे झाली. या स्पर्धेत विजय विकास सामाजिक संस्थेतर्फे भक्ती भोईर हिने काता प्रकारात गोल्ड मेडल तर कुमिते प्रकारात गोल्ड मेडल पटकाविले आहे.

त्याचप्रमाणे तनिष्का ठाकूर काता प्रकारात गोल्ड मेडल कुमीते प्रकारात सिल्वर मेडल; स्वरा सुनील पेढवी याने काता प्रकारात सिल्व्हर मेडल, कुमिते प्रकारात गोल्ड मेडल; ओम पाटील याने काता प्रकारात सिल्व्हर मेडल कुमिते प्रकारात गोल्ड मेडल पटकाविले. रियांशी कालेल काता प्रकारात गोल्ड मेडल, तनिष मढवी काता प्रकारात सिल्वर मेडल, कुमिते प्रकारात ब्राँझ मेडल; आशा सोनावणे कुमिते प्रकारात ब्राँझ मेडल, काता प्रकारात गोल्ड मेडल; भूमी पाटील ब्राँझ मेडल, जतीन म्हात्रे ब्राँझ मेडल, दिक्षा वग्रे ब्रॉन्झ मेडल, नैतिक घरत ब्राँझ मेडल असे विविध स्पर्धकांनी मेडल पटकाविले आहेत. सांघिक स्पर्धेत विजय विकास सामाजिक संस्थेला तिसरा क्रमांक मिळाला. एक भव्य चषक, एक सायकल असे बक्षीस या संस्थेला मिळाले आहे.

विजयी स्पर्धकांना कोच दिपक घरत, प्रगती घरत, मिलन जाधव, अजय तांडेल, सोनल तांडेल यांचे मार्गदर्शन लाभले आहेत. या सर्वच विजयी स्पर्धकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

क्रीडा महाकुंभ २६ जानेवारीपासून

मुंबई : महाराष्ट्र सरकारचे मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा कार्यालय, मुंबई महानगरपालिका, क्रीडा भारती, मुंबई पोलीस, मुंबई विद्यापीठ, एसएनडीटी विद्यापीठ व क्रीडा संघटना यांच्या सहकार्याने श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महाकुंभचे आयोजन २६ जानेवारी ते १९ फेब्रुवारी या कालावधीत केले जाणार आहे.

सहभागासाठी २० जानेवारीपर्यंत मुदत असून संबंधित खेळाच्या संघटनांबरोबर संपर्क करून किंवा www.mahakridakumbh.com या वेबसाईटवर भेट देऊ शकता.

गव्हाण विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव | चेअरमन अरुणशेठ भगत यांची उपस्थिती

गव्हाण : रामप्रहर वृत्त

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सवास उत्साहात प्रारंभ झाला. विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी (दि.१०) क्रीडाज्योत प्रज्वलित करून या महोत्सवाचे उद्घाटन झाले.

या वेळी उद्घाटनपर कबड्डी व खो-खोचे दोन सामने मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये खेळविण्यात आले. विद्यार्थ्यांना क्रीडा महोत्सवानिमित्त शुभेच्छा देताना विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांनी, सांघिक वृत्ती वृद्धिंगत करून खिलाडू वृत्तीचे प्रदर्शन करून श्रेष्ठ व उत्तम दर्जाचे खेळाडू या स्पर्धांमधून निर्माण व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. त्याचप्रमाणे नमो चषक स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग सहभाग नोंदवून आपल्या सर्वोत्तम खेळाचे प्रदर्शन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

या वेळी ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर, देवेंद्र म्हात्रे तसेच स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी, विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा महोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या आरएसपी ग्रुपच्या वतीने मान्यवरांना मानवंदना देण्यात आली, तसेच खेळाची सामुहिक प्रतिज्ञा होऊन क्रीडा स्पर्धेस प्रारंभ झाला.

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष नामदेव ठाकूर, विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, 'रयत'चे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, क्रीडाशिक्षक जयराम ठाकूर, गुरुकूल प्रमुख संदीप भोईर, ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर, देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील, प्रमोद करावकर, प्रशांत परदेशी, शितलकुमार म्हात्रे, विद्यालयाचे ग्रंथपाल महेश म्हात्रे तसेच ज्युनिअर कॉलेजचे राजेंद्र चौधरी यांचेसह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

महिला शिक्षिका चारुशीला ठाकूर, अस्मिता वर्तक, प्रणाली पाटील, वृषाली म्हात्रे, संपदा म्हात्रे, द्रौपदी वर्तक, उर्मिला गोंधळी, उज्ज्वला म्हात्रे, सुजाता शेलार, अपर्णा देवकुळे, सोनाली घरत, ज्योत्स्ना कोळी, हर्षला पाटील यांनी कबड्डी व खो - खो सामन्यांचे पंच, गुणलेखिका व वेळाधिकारी म्हणून चोख भूमिका बजावली. ग्रंथपाल महेश म्हात्रे यांनीदेखील खो-खो सामन्याचे पंच म्हणून कामगिरी बजावली.

या क्रीडा महोत्सवात सलग दोन दिवस विविध खेळांचे सामने खेळले जाणार असून चांगल्या दर्जाचे क्रीडाप्रदर्शन यानिमित्ताने होणार असल्याचे विद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख जयराम ठाकूर यांनी सांगितले.